# शब्द रुची

४६

मार्च २०२२

मूल्य १० रुपये । पृष्ठे ४०



कविता देवी



शुभदा देशमुख

स्वयंसाहाय्यता... स्वयंउत्थान!






@abpmajhatv
abp
माझा
दिलखुलास
व्यक्तिमत्वांसोबत
दिलखुलास गप्पा
पाहायला विसरू नका
दर शनि. रात्री ९ वा.
पुन:प्रक्षेपण - रवि. सकाळी ९ वा.
माझा
कट्टा
एपिसोड्स
पाहण्यासाठी
स्कॅन करा.
facebook.com/abpmajha
instagram.com/abpmajhatv
twitter.com/abpmajhatv
www.kooapp.com/profile/abpmajha
youtube.com/abpmajhatv
www.abplive.com
For queries, please contact: adsales@abpnetwork.com | Download the ABP Live app

विवेकशील विचार, व्यापक संवाद, कलात्म जाण आणि सजग समाजभान अर्थात शब्द रुची


**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

# शब्द रुची

**मार्च २०२२, वर्ष नववे**
**अंक अकरावा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
मुखपृष्ठ : **ग्रंथाली संगणक विभाग**



**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
granthaliad@gmail.com
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**


**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**


पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५०
granthali02@gmail.com
www.granthali.com


**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : सकाळी १२ ते सायं. ६**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**


**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**


## अनुक्रम


धगधगती मशाल / **५**
**अपर्णा पाटील**

आम्ही आमच्या आरोग्यासाठी – एक लोकचळवळ / **९**
**शुभदा देशमुख**

यशोशिखर गाठणारी यशस्विनी / **१२**
**डॉ. अनंत लाभसेटवार**

गोष्ट कार्बन डायऑक्साईडची / **१५**
**शरद काळे**

माय नेम इज रेड – ओरहान पामुक / **१८**
My Name is Red by Orhan Pamuk
**राजीव श्रीखंडे**

कथा तीन चित्रकारांच्या / **२२**
**विजयराज बोधनकर**

डॉक्टर अविनाश सुपे / **२५**
**प्रकाश दुधळकर**

**ग्रंथाली पुस्तकप्रकाशन वृत्तांत / २९**

**'ग्रंथाली' ग्रंथपाने / चांगदेव काळे / ३४**




**१ एप्रिल २०२२ पासून**
**'शब्द रुची'ची वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**३ वर्षाची एकत्रित भरल्यास १००० रुपये**
**२ विशेषांक व दिवाळी अंक यांच्यासह**

# संपादकीय...

**महिलादिन** जागतिक पातळीवर मान्यता पावला तो १९७७ साली. विसाव्या शतकाच्या आरंभीच्या दशकांत महिलांच्या अधिकारांबाबत, सर्वांगीण विकासाबाबत विचार व्हायला लागला. याच काळापर्यंत स्त्रियांना मतदानाचाही अधिकार नव्हता. ज्या स्त्रीनं पहिल्या क्रांतीची धुरा वाहिली अर्थात मानव शेती करू लागला, तिला अधिकार मागावे लागले. अर्धं आकाश व्यापलेल्या गटाला पुरुषी मानसिकतेशी लढा देऊन ते मिळवावे लागले. आज सर्वच क्षेत्रांत स्त्रिया आपलं कर्तृत्व सिद्ध करत आहेत; आजच्या तंत्रज्ञानाधारित काळात आणि बदलत्यात जीवनशैलीत त्यांना आपलं महत्त्व आणि स्वत्व कळलंय; त्या आपली मतं अधिकारवाणीनं मांडत आहेत; हे चित्र दिसत असलं, तरी प्रत्यक्षात कमावत्या व कर्तृत्ववान स्त्रीलाही खरंच पूर्ण सन्मानानं वागवलं जातंय का, हा प्रश्न आहे.

इंदिरा गांधी म्हणाल्या होत्या, 'हम महिलाओं को कहते तो देवी हैं, लेकिन उनके साथ देवियों जैसा व्यवहार नहीं होता.' या देशाला कणखर नेतृत्व दिलेल्या स्त्री प्रधानमंत्र्यांचं हे वक्तव्य आजही लागू पडतं. महिलांना राजकारणात तेहेतीस टक्के, पन्नास टक्के आरक्षणाबद्दल बोललं गेलं. ते काही ठिकाणी मान्यही झालं. मात्र गावपातळीवरही सरपंच म्हणून निवडून आलेल्या स्त्रीचा कारभार प्रत्यक्ष कोण हाकतो, हे अनेकदा दिसून आलंय. सभेत मंचावर सरपंच स्त्री मागच्या रांगेत व पुढे तिचा पती असं चित्र असेल तर कसल्या पुरोगामीत्वाच्या आणि आधुनिकतेच्या गप्पा आपण मारतो?

स्वयंसाहाय्यता आणि स्वयंउत्थानाचा मार्ग स्त्रियांनीच चोखाळला. जगभरातील अनेक कर्तृत्ववान स्त्रियांची माहिती आपल्याला असते. अशाच दोन स्त्रिया, स्त्रियांना शक्ती देण्याचं काम करत आहेत. बुंदेलखंडसारख्या डोंगराळ भागात, वीस वर्षांपूर्वी छोट्याशा गावात पत्रकार म्हणून काही महिलांचा प्रवास सुरू झाला. तो संघर्ष थक्क करतो. कविता देवी या पत्रकार स्त्रियांचं शक्तिस्थान आहे. ही कहाणी मांडली आहे अपर्णा पाटील यांनी.

'आम्ही करणार नाही, आम्ही मार्गदर्शकही नाही. आपण मिळून मार्ग काढू. ज्यांचे प्रश्न आहेत त्यांनीच उभं राहिलं पाहिजे,' ही आत्मनिर्भरतेची जाणीव रुजवून शुभदा देशमुख यांनी गेली अडतीस वर्षं ग्रामसभा, लोकशक्ती आणि स्त्रिया यांना केंद्रस्थानी ठेवून कार्य केलेल्या त्यांच्या संस्थेच्या समाजभानाचा पट मांडला आहे.

फेब्रुवारी २८ हा विज्ञानदिवस. जानेवारीच्या अंकापासून शरद काळे यांचं 'आपले निसर्गऋण' हे विज्ञानभान देणारं सदर सुरू झालं आहे. त्यातील 'गोष्ट कार्बन डायऑक्साईडची' हा लेख या अंकात आहे.

या महिन्यात विजयराज बोधनकर यांचं 'चित्रगुज पश्चिमेचे' हे सदर सुरू करत आहोत. पश्चिमी देशांतल्या अप्रसिद्ध चित्रकारांची ओळख यातून होईल. शल्यचिकित्सक म्हणून ख्यातनाम असलेले डॉ. अविनाश सुपे यांचे वैद्यकक्षेत्रातील कर्तृत्व सर्वश्रुत आहे. या अंकात त्यांच्या छायाचित्रणकलेबाबत प्रकाश दुधळकर यांनी लिहिले आहे.

राजीव श्रीखंडे यांचं 'ग्लोबल ग्रंथपरिचय' हे सदर आहेच. महिलांचे जागतिक अभिजात साहित्य आपल्याला संजीवनी खेर 'ग्लोकल लेखिका' या कार्यक्रमातून उलगडून दाखवतात. त्यांच्या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद लाभत आहे. Granthali Watch या यूट्यूब चॅनेलवर 'ग्रंथाली'चे उपक्रम अवश्य पाहा.

जगभरात आपल्या आवाजाचं गारुड केलेल्या भारतरत्न लता मंगेशकर यांचं गेल्या महिन्यात निधन झालं. त्यांना आदरांजली वाहणारा एप्रिलचा विशेषांक असेल. गायक सुदेश भोसले त्याचे अतिथी संपादक आहेत.

**– अरुण जोशी**
कार्यकारी संपादक



अपर्णा पाटील

# धगधगती मशाल

**पंचवीस**-तीस वर्षांपूर्वी पत्रकारिता हे पुरुषांचं क्षेत्र होतं. अगदी दिल्ली, मुंबईसारख्या शहरांतील प्रमुख दैनिकांमध्येही हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्याच महिला पत्रकार म्हणून काम करत होत्या. त्याही उच्चभ्रू, सुशिक्षित आणि सुरक्षित कुटुंबातून आलेल्या. या महिलांनाही आपलं स्थान निर्माण करण्यासाठी अनेक आव्हानांना तोंड देत संघर्ष करावा लागला. डिजिटल क्रांती झाली आणि महिलांची पत्रकारितेच्या क्षेत्रातील संख्या लक्षणीय म्हणावी, अशी वाढली. अत्यंत धाडसी, फील्डवर रिपोर्टिंग करणाऱ्या धडाकेबाज महिला पत्रकार या वेगवेगळ्या वृत्तवाहिन्यांच्या ओळख बनल्या. शहरापासून दूर बुंदेलखंडसारख्या डोंगराळ भागात वीस वर्षांपूर्वी छोट्याशा गावांतून पत्रकार म्हणून काही महिलांचा प्रवास सुरू झाला. त्यापैकीच एक ठसठशीत नाव आहे कविता देवी.



कविता देवी

कविता देवी या 'खबर लहरिया' या वृत्तपत्राच्या सहसंस्थापक-संपादक आहेत. देशातील केवळ महिलांनी चालवलेलं, विशेषतः दलित, अल्पसंख्याक आणि आदिवासी महिला चालवत असलेलं हे वृत्तपत्र आहे. महानगरांमधल्या वर्तमानपत्रात किंवा वृत्तवाहिन्यांमध्ये काम करणाऱ्या महिला पत्रकारांपेक्षा 'खबर लहरिया'च्या महिला पत्रकार वेगळ्या आहेत. त्यापैकी अनेकींना आपलं शिक्षणही पूर्ण करता आलेलं नाही. यूट्यूबवरील एखाद्या व्हिडीओमध्ये, घरात डोक्यावरचा घुंघट ओढत, भाकरी थापताना त्या जेव्हा दिसतात, तेव्हा एखाद्या खेड्यातल्या सर्वसामान्य स्त्रिया असतात. मात्र त्या परिसरातल्या समस्यांवर बोलतात, तेव्हा त्या किती मेहनती आणि निर्भीड पत्रकार आहेत, हे चटकन लक्षात येतं. मुख्य प्रवाहात किंवा वाहिन्यांवरील शेकडो पत्रकार महिलांइतकीच धडाडी आणि आत्मविश्वास त्यांच्याकडे आहे, हे लक्षात येतं. विचार मांडण्याची आणि समोरच्याला प्रश्न विचारण्याची धाडसी वृत्ती त्यांच्याकडे आहे. या सगळ्या महिलांचं शक्तिस्थान आहेत, कविता देवी.

देशात प्रसिद्धी माध्यमांमध्ये 'खबर लहरिया' हा आगळा प्रयोग मानता येईल. ग्रामीण भागांतील समस्यांना वाचा फोडणाऱ्या, सरकारी योजनांमध्ये होणारे गैरप्रकार उघड्यावर आणणाऱ्या या वृत्तपत्राची सुरुवात झाली ती चित्रकूट जिल्ह्यात २००२मध्ये. हा जिल्हा मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशच्या सीमांशी जोडलेला आहे. आजही दुर्गम म्हणावा असा हा भाग आहे. या भागात जंगले आहेत. दगडांच्या खाणी आहे. त्याहीपेक्षा दरोडेखोरांचा प्रदेश म्हणून ओळखलं जाणारं चंबळ इथे आहे. चित्रकूट जिल्ह्यांतील गावात जाण्यासाठी पुरेसे रस्तेही नाहीत, पाणी नाही, अशा भागांत वीस वर्षांपूर्वी एक वर्तमानपत्र काढणं, तेही महिलांनी आणि त्याही तळागाळातल्या उपेक्षित वर्गातील महिलांनी, हे किती मोठं धाडसं असेल, याची आपण कल्पनाच करू शकतो.

कविता देवी म्हणजेच कविता बुंदेलखंडी. त्या 'खबर लहरिया'च्या सहसंस्थापक संपादक-पत्रकार आहेत. त्यांच्या मुलाखती किंवा असंख्य शो लोकांनी यूट्यूब किंवा 'खबर लहरिया'च्या डिजिटल माध्यमातून पाहिले आहेत. अत्यंत सहजतेनं त्या आपल्या मुद्दे मांडतात. कुठेही नाटकीपणाचा आव न आणता, स्पष्ट मत त्या मांडतात. आपलं मत मांडण्यासाठी आवाज वाढवलाच पाहिजे, अशी मानसिकता वाढलेल्या समाजात आणि काळात कविता देवी यांची ही प्रतिमा अत्यंत आश्वासक तितकीच बंडखोर आहे.

साधी साडी किंवा पंजाबी ड्रेसमध्ये कॅमेऱ्यासमोर आपलं मत कविता देवी मांडतात, तेव्हा या साध्याशा दिसणाऱ्या स्त्रीमध्ये किती संघर्षांचा सामना करण्याची ताकद आहे, याचा अंदाज



वृत्तपत्र असलं तरी त्यामागे निश्चित असा उद्देश होता.

चित्रकूटसारख्या जिल्ह्यात मुळात साक्षरतेचं प्रमाण कमी होतं. गावात बातम्या समजण्याचं दुसरं काहीच साधन नव्हतं. जिथं कोणी वाट वाकडी करून साधं जायलाही तयार होत नाही, त्या भागातल्या समस्या मांडण्यासाठी तिथवर पोचायचं त्यांचं लक्ष्य होतं. गावात काय चाललं आहे, हे दिल्लीपर्यंत पोचलं पाहिजे; पददलितांच्या वस्त्यांमध्ये काय घडतंय, त्यांच्या समस्या काय आहे, हे त्या गावाच्या जिल्ह्याच्या मुख्यालयापर्यंत तरी पोचलं पाहिजे. कोणी छापायलाही तयार होणार नाही, अशा त्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांच्या बातम्या दिल्या पाहिजेत, याच विचारांनी हे वृत्तपत्र सुरू करण्यात आलं होतं. तेही त्यांच्या बोलीभाषेतून.

आपण करू शकत नाही. कविता देवी यांचा जन्म उत्तर प्रदेशातील बांदाजवळील कुंजन पूर्वा या दुर्गम गावात दलित शेतकरी कुटुंबात झाला. सहा मुलांपैकी सर्वात मोठ्या असलेल्या कविता देवी यांचं वयाच्या बाराव्या वर्षी लग्न झालं. त्या अशा कुटुंबातून आलेल्या होत्या, की महिला काय पुरुषही अशिक्षित होते. एका स्वंयसेवी संस्थेनं त्यांच्या गावात साक्षरतावर्ग सुरू केले. त्यावेळी त्याच काय गावातील एकही मुलगी शिकलेली नव्हती. त्या गावात आणि कुटुंबात मुलींना शिकवणंही गुन्हा मानलं जात होतं. त्याच ठिकाणी त्यांनी सहा महिने शिकायला सुरुवात केली. लोकांकडून वाट्टेल ते टोमणे त्यांना ऐकावे लागतं. रोज अपमान होत असे. आपल्या कुटुंबासह गावकऱ्यांकडून होणारा जोरदार विरोध त्यांनी सहन केला. त्या मागे हटल्या नाही. त्याविषयी सांगताना कविता देवी म्हणतात, 'मला स्वतःचं नाव तर माहीत होतं; पण ते कसं लिहायचं हे माहीत नव्हतं!' साक्षरतावर्गातल्या त्या शिक्षणानं मात्र त्यांना वेगळीच ओळख मिळवून दिली.

कविता देवी गावातल्या शिक्षित झालेल्या पहिल्या मागासवर्गीय महिला ठरल्या. पुढे त्यांनी पदवीपर्यंतचं शिक्षण घेतलं. त्यानंतर पत्रकारितेत पदव्युत्तर शिक्षणही घेतलं. पण त्याआधी त्या गावातल्या साक्षरता केंद्राद्वारे चालवल्या जाणाऱ्या 'महिला डाकिया' या छोट्या वृत्तपत्रासोबत काम करायला लागल्या. पत्रकारितेतलं त्यांचं ते पहिलं पाऊल होतं. २००२मध्ये त्यांनी अन्य सात महिलांच्या सोबतीनं स्वतंत्रपणे 'खबर लहरिया' सुरू केलं.

'खबर लहरिया' सुरुवातीला हातानं लिहिलं जाणारं आणि महिन्यातून एकदाच काढलं जाणारं वृत्तपत्र होतं. ते वितरण करण्याची जबाबदारीही कविता देवी यांच्यासह बाकीच्या महिलांनी स्वतःच घेतली. त्यावेळी सायकल विकत घेणंही त्यांना परवडणारं नव्हतं. अशावेळी घरोघरी जात आपलं वृत्तपत्र विकण्याची जबाबदारी त्यांनी घेतली होती. कारण 'खबर लहरिया' हे महिलांकडून चालवणारं

पत्रकारितेचं क्षेत्र महिलांचं काम नाही, अशा विचार रूजलेल्या समाजात या महिलांचं हे पाऊल म्हणजे क्रांतीच म्हणायला हवी. शिक्षिका, आरोग्यसेविका अशी सुरक्षित कामं सोडून पत्रकार होण्याच्या जिद्दीनं पेटलेल्या कविता देवींसह बाकीच्या महिलांनी वृत्तपत्र सुरू केलं. गावागावांत जाऊन समस्या जाणून घेत वृत्तांकन करण्याची पद्धत रूढ केली. आता फोन, इंटरनेटमुळे अशाप्रकारची पत्रकारिता कमी होत आहे. समाजमाध्यमं किंवा माहिती यंत्रणांच्या मदतीनं लोकापर्यंत बातम्या पोचतात. त्यामुळे पत्रकार बातमीच्या ठिकाणी जाण्याचे फारसे कष्ट घेत नाहीत. विशेषतः ते भाग दुर्गम असतील तर अजिबातच जाण्याच्या फंदात पडत नाहीत. परंतु 'खबर लहरिया'च्या महिला पत्रकार तसं करत नाहीत.

'खबर लहरिया'ची सुरुवात चित्रकूट जिल्ह्यातून झाली तेव्हा ते दोन पानांचं महिन्यांतून एकदा निघणारं ब्लॅक अँड व्हाइट वृत्तपत्र होतं. दोन रुपयांचं ते वृत्तपत्र विकण्यासाठी तिथल्या पत्रकार महिलाच पायी फिरत. बुंदेली भाषेत, सहज वाचू शकतील अशा आकारातील फाँटमध्ये छापल्या जाणाऱ्या त्या दोन पानी बातम्या मिळवणही त्यांच्यासाठी सोपं काम नव्हतं. लोक गावातून त्यांना अक्षरशः पळवून लावत.

सुरुवातीला तर महिलांना पत्रकार मानणंही लोकांना मंजूर नव्हतं. हे महिलांचं कामच नाही. त्यातही गावातल्या, त्याही दलित, मुस्लीम, आदिवासी महिलांनी हे काम करणं म्हणजे तिथल्या पुरुषांसाठी धोकादायकच होतं. या महिला पंचायत, प्रशासनाला प्रश्न कशा काय विचारू शकतात, असा जाब त्यांना विचारला जाऊ लागला.

कविता देवी यांनी एका मुलाखतीत त्या प्रसंगांविषयी सांगितलं आहे. 'सुरुवातीला आम्ही जेव्हा गावागावांत बातम्यांसाठी जात असू तेव्हा लोक आम्हाला सहकार्य करत नव्हते. मुळात आम्हाला

ते पत्रकारच मानत नव्हते. अनेकदा आम्ही एकाच बातमीसाठी त्या गावात तीन-तीनदा जायचो. सुरुवातीला तर आमच्या टीममध्ये शिकलेल्या महिलाही नव्हत्या अगदी पाचवी, सातवीत शिकलेल्या होत्या. काही तर ठार निरक्षरच होत्या. पण त्यांच्याकडे असलेल्या माहितीचा स्रोत हा अत्यंत समृद्ध होता. अनेकींना बातम्या मिळवण्यात अडचण येत नव्हती, पण ती लिहून काढणं जमत नव्हतं. अशावेळी आम्ही त्यांच्या बातम्या लिहून काढायचो. काहींना राजकारणाची समजही नव्हती. न्यायालय कशाला म्हणतात, आमदार-खासदार कशाला म्हणतात हे त्यांना माहीतही नसायचं. चार भिंतीच्या आड राहिलेल्या महिलांनी अशा विषयांवर लिहावं किंवा बातम्या आणाव्यात, अशी अपेक्षा करणंही चुकीचं होतं. पण आम्ही त्यांना प्रशिक्षण दिलं. मग अगदी महिला स्वातंत्र्य म्हणजे काय, महिला सक्षमीकरण कशाला म्हणायचं, त्यांचे अधिकार काय आहेत, अशा मूलभूत बाबींचंही प्रशिक्षण त्यांना देण्यात आलं. आज उत्तरेकडील निवडणुकींच्या धामधुमीत 'खबर लहरिया'च्या महिला पत्रकारांनी केलेलं धडाकेबाज रिपोर्टिंग पाहिलं की ते प्रशिक्षण त्यांना किती उपयोगी पडलंय हे लक्षात येतं, असं त्या सांगतात.

बुदेलखंड जिल्ह्यातील खेडोपाडी मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवाज उठवण्याचं काम या वृत्तपत्रानं केलं. सरकारी योजना लागू होत नाही, झाली तर गैरव्यवहार होतात, त्याविरोधात आवाज उठवणं. महिलांवरील हिंसाचाराच्या घटना, खाणींच्या उत्खननामुळे निर्माण झालेलं पर्यावरणसंकट यासारख्या सर्वच विषयांना न्याय मिळवून देण्याचं काम त्या करत आहेत. खेड्यातल्या छोट्याशा समस्येची दखल थेट दिल्ली दरबारी घ्यायला लावण्याचं महत्त्वाचं काम त्यांनी सुरुवातीपासूनच केलं आहे.

नौगवा गावामध्ये सरकारी पाणी योजना आली. त्यासाठी गावात कालवा खोदण्यात आला. परंतु वीस वर्षं झाली तरी कोणी सरकारी अधिकारी किंवा लोकप्रतिनिधीही या योजनेचं पुढे काय झालं पाहायला गावाकडे फिरकला नाही. 'खबर लहरिया'ची पत्रकार गीता देवी हिनं त्यावर वृत्त दिलं. त्यासाठी गावातल्या शेतकरी, महिलांच्या मुलाखती घेतल्या. या वृत्ताची दखल घेत अधिकारी जागे झाले. आणि वीस वर्षांपासून तहानलेल्या गावाला पाणी मिळालं. या घटनेनंतर एका गावात कविता देवी गेल्या. सहा किलोमीटर चालत त्या गावापर्यंत त्या पोचल्या होत्या. तिथल्या ग्रामस्थांनी अशरक्षः त्यांना चोहोबाजून घेरावच घातला. तिथल्या अनेक समस्या मग लोक त्यांना सांगू लागले.

निर्भीड आणि निडर अशा पत्रकारितेचं कविता देवी साक्षात उदाहरण ठरल्यात. दस्यु सुंदरी साधना पटेल हिच्याविषयी त्यांनी दिलेल्या वृत्ताचं उदाहरण ठळकपणे सांगता येईल. कविता देवी पहिल्या पत्रकार होत्या, ज्या दरोडेखोर म्हणून कुख्यात झालेल्या साधना पटेलच्या घरी पोचल्या होत्या. त्या तिच्या कुटुंबीयांना भेटल्या. त्यावेळी तिच्याविषयीची खरी माहिती लोकांसमोर आणली. त्याचं दोन भागांतील वृत्तांकन आपण यूट्यूब आणि खबर लहरियाच्या डिजिटल माध्यमांवर पाहू शकतो.

चंबळमध्ये दरोडेखोरांचा उपद्रव होता आजही आहे. स्थानिक पातळीवर त्याची दखल घेतली गेली. साधनाच्या आईवडिलांशी बोलून दुसरी बाजू काय, हे लोकांसमोर आणलं गेलं. तिचं खरं छायाचित्र देण्यात आलं. त्यामुळे 'खबर लहरिया'ची विश्वासार्हता वाढली. हे सगळं 'खबर लहरिया'मधील महिलांचं मनोबल वाढवणारं होतं. त्याचबरोबर त्यांच्या पत्रकारितेचा पाया मजबूत करणारं होतं. सुरुवातीला एखाद्या बातमीसाठी कविता किंवा त्यांच्या सहकारी गावात जात, तेव्हा गावकरी त्यांच्याशी बोलायलाही तयार नसायचे, पण त्यांच्या अनेक बातम्यांमुळे ज्या गावात कधी प्रशासनाचे कर्मचारीही पोचले नव्हते, तिथे जिल्हाधिकारी पोचायला लागले.

आपल्या छोट्याशा गावातल्या रेशन दुकानातील गैरप्रकाराची, पाणीटंचाईची दखल सरकारी दरबारी घेतली जातेय पाहून आपल्या गावातल्या बातम्याही 'खबर लहरिया'मध्ये याव्यात, असं गावोगावच्या ग्रामस्थांना वाटायला लागलं. इतकंच नाही तर एखाद्या बातमीची दखल घेतल्यानंतर लोक पेपर छाताशी घट्ट धरून भावूक व्हायचे.



पाडे म्हणावेत अशा गावांमध्ये एखादीच प्रत लोक विकत घेऊ शकायचे. मग गावातल्या पारावर सामूहिकरीत्या त्याचं वाचन करायचे. हळूहळू या ग्रामस्थांना

हा पेपर आवडू लागला. ते त्यांच्या समस्या या महिलांना कळवू लागले. मग बांदा, झाशी, फैजाबाद अशा जिल्ह्यांच्या सीमा कधी पार झाल्या हे त्या महिलांनाही कळलं नाही. 'खबर लहरिया'ने उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश आणि बिहार अशा राज्यांपर्यंत आपला पसारा वाढवला.

२०१२मध्ये चाळीस महिला पत्रकारांच्या या वृतपत्रानं सहाशे गावांत सहा हजार प्रतींपर्यंतचा टप्पा पार केला होता. दिल्ली, मुंबईसारख्या मोठ्या वर्तमानपत्रांच्या खपाच्या तुलनेत हे आकडे किरकोळ असले तरी बातम्यांची निवड, पत्रकारांची धडाडी आणि एक प्रादेशिक भाषेतून निघाणारे वृत्तपत्र यांच्याशी 'खबर लहरिया'ची तुलना करणंही अन्यायकारक ठरेल. २०१५मध्ये एका संस्थेच्या मदतीनं हे वृत्तपत्र डिजिटल झालं आहे.

एकेकाळी बातम्या लिहण्यासाठी महिलांना साक्षरतेचे धडे द्यावे लागले होते. आता इंटरनेटच्या मदतीनं आपल्या बातम्या कशा द्यायच्या, यासाठी मोबाइल कसा वापरायचा हे इथल्या महिला पत्रकार समजून घेत आहेत. एकेकाळी सायकल परवडत नाही म्हणून पायी हिंडून पेपर विकणाऱ्या या महिला पत्रकार डिजिटल माध्यमातून बातम्यांचं प्रक्षेपण, चित्रीकरण, संकलन सहज करत आहेत.

सुरुवातीला बुंदेलखंडमधील समस्या मांडणाऱ्या या महिला आता सर्व विषयांवर वृत्तांकन करत आहेत. राजकारण, पाककृती, सिनेमा या विषयांना 'खबर लहरिया'मध्ये स्थान देण्यात आलं आहे. विशेष म्हणजे स्थानिक बातम्या देताना सकारात्मक बातम्या देण्यात त्यांनी पुढाकार घेतला आहे. लोकल हीरो, खेळाडू, कलाकारांची दखल घेण्याचंही काम केलं जातं, असं कविता देवी आवर्जून सांगतात.

बुंदेलीसह अन्य भाषांमध्ये हे वृत्तपत्र सुरू झालं आहे. आज वितरणाचं काम पुरुष करत असले तरी सगळा स्टाफ महिलांचा आहे. पत्रकार म्हणून निवड करण्यासाठी जाहिराती दिल्या जातात किंवा पॅम्प्लेट वाटून भरतीची माहिती दिली जाते. महिलांना मुलाखतींना बोलवलं जातं. मग निवड झाली की पत्रकारितेचे नियम समजावून सांगितले जातात. त्यांना प्रशिक्षण दिलं जातं. तीन महिन्यांच्या कालावधीत फील्ड रिपोर्टिंग करण्यासाठी पाठवलं जातं. त्यामुळेच अत्यंत सक्षम अशी पत्रकारिता 'खबर लहरिया'च्या माध्यमातून जिवंत आहे. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडणारी, विशिष्ट राजकीय विचारांकडे न झुकलेली अशी ही पत्रकारिता सध्याच्या परिस्थितीत असणं हे लोकशाही सुदृढ करणारं आहे.

आज 'खबर लहरिया'ने पत्रकारितेच्या क्षेत्रात स्वतःचं स्थान निर्माण केलं आहे. त्यामुळे आधीच्या पत्रकार महिलांना आलेले अनुभव आताच्या महिलांच्या वाट्याला येत नाहीत. मात्र विशिष्ट समाजातील असल्याने त्यांना मोठ्या प्रमाणावर ट्रोल केलं जातं. स्वतः कविता देवी आपला शो प्रसारित करतात, त्यात परखड मतं मांडतात, त्यावर टीकेचा भडिमार केला जातो. त्यांच्या मते, 'ट्रोल हे आमच्यावरील सगळ्यात मोठं संकट आहे. आमच्यासमोरची आव्हानं कधी संपणार नाहीत. कधी काळी आम्ही दोन पानांचा पेपर सुरू केला होता. तो रंगीत अंक झाला, पानं वाढली. जिल्हे वाढले. डिजिटल झालो, याचा आनंद आहेच, पण त्याहीपेक्षा आम्ही संकटांना धमक्यांना घाबरलो नाही. आम्ही ताठ मानेने त्याचा सामना केला. स्वांतत्र्यांच्या इतक्या वर्षांनंतरही सरकारच काय तर प्रशासनही पोचलं नाही, अशा खेड्यांमध्ये आम्ही पोचलो. शेतकरी, पददलितांचा आवाज त्यांच्यापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला, हे समाधान देणारं आहे'.

कविता देवी यांना पत्रकारितेच्या क्षेत्रातील मानाचे पुरस्कार मिळाले आहे. 'टेड टॉक्स'सारख्या शोमध्ये सहभागी होण्याची संधीही त्यांना मिळाली आहे.

२००४मध्ये, पेपरमधील पत्रकार एकत्रितपणे उत्कृष्ट महिला प्रसारकांसाठी चमेली देवी जैन पुरस्काराचे मानकरी ठरले. या वृत्तपत्राची २००९च्या युनेस्को साक्षरता पुरस्कारासाठी निवड झाली. २०१४पर्यंत, पेपरच्या सहा आवृत्त्या होत्या आणि सुमारे ४० महिला पत्रकार होत्या. कविता देवी या एडिटर गिल्ड ऑफ इंडियाच्या सदस्य बनलेल्या पहिल्या दलित महिला संपादक ठरल्या. दोराबजी टाटा ट्रस्ट, नॅशनल फाउंडेशन ऑफ इंडिया आणि दलित फाउंडेशन यांच्याकडून या वृत्तपत्रासाठी निधी उपलब्ध झाला. हे सगळं 'खबर लहरिया' आणि खुद्द कविता देवी यांना प्रोत्साहन देणारं ठरलं आहे.

'खबर लहरिया'ने महिलांना काय मिळवून दिलं, असा प्रश्न जर कोणी विचारला तर कविता देवी ठामपणे म्हणतात, या महिलांचा स्वतःचा विकास झाला. त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्यांच्या मुलांना त्या विशिष्ट मूल्यांच्या आधारे आज वाढवू शकत आहेत. त्यांना ताकद मिळाली आहे. कविता देवी यांचे हे शब्द म्हणजे हजारो शब्द लिहूनही महिला सक्षमीकरण म्हणजे काय हे सांगता येणार नाही, इतके आशयसंपन्न आहे.

यंदाच्या ऑस्कर पुरस्काराच्या सर्वोत्कृष्ट माहितीपटासाठी नामांकन मिळालेल्या 'रायटिंग विथ फायर'मधून कविता देवी आणि 'खबर लहरिया'च्या याच संघर्षाची आणि प्रेरणादायी प्रवासाची दखल घेण्यात आली आहे. या निमित्तानं 'खबर लहरिया'ची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोचते आहे. केवळ कविता देवीच नाही तर खबर लहरियाशी संबंधित असलेली प्रत्येक महिला म्हणजे महिला सक्षमीकरणाचं आणि महिला संघर्षाचं एक खणखणीत उदाहरण आहे. देशातल्या नेत्यांकडून दुर्लक्षिल्या गेलेल्या, समाजाकडून अव्हेरल्या गेलेल्या आणि कुटुंबाकडून दमन होत असलेल्या महिलांसाठी 'खबर लहरिया' म्हणजे खवळलेल्या समुद्रातला दीपस्तंभ आहे. कोणतीही आक्रमकता न दाखवता सुरू असलेल्या क्रांतीच्या कविता देवी धगधगती मशालच आहे, असं म्हणता येईल.

**– अपर्णा पाटील**
भ्रमणध्वनी : ८९८३८२०२०२
aparna.patil1@gmail.com



शुभदा देशमुख

# आम्ही आमच्या आरोग्यासाठी - एक लोकचळवळ

**'आम्ही** आमच्या आरोग्यासाठी' हे संस्थेचे नाव बऱ्याचदा गोंधळात टाकणारे वाटते. परंतु याची नाळ जुळली आहे ती 'आपण आपला मार्ग शोधू या' या तत्त्वाशी. हे आपण म्हणजे लोक/महिला/ आदिवासी/ त्या गावातील, त्या जिल्ह्यातील, त्या परिसरातील जे आपण किंवा आम्ही म्हणून एकत्रित काम करायला तयार असतील ते सर्वच. या धारणेमागे असणारा विश्वास हाच, की ज्याचे काम त्यालाच करावे लागणार, आपला विकास दुसरे कुणी करणार नाही. साधारणत: लोकांमध्ये काहीतरी करायला येणारे शासन, संस्था किंवा कुणीही यंत्रणा यांच्याकडून हे आपल्यासाठी काय करणार किंवा आपल्याला काय देणार, हाच प्रश्न असतो. कारण आजवर हीच सवय सगळ्यांनी जनतेला लावलेली आहे. तुमचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रतिनिधी, सरकार, कर्मचारी, संस्था असाच विचार या सर्व घटकांनीही रुजवला आहे.

संस्थेची सुरुवात करण्यापूर्वी आम्ही - मी व डॉ. सतीश गोगुलवार, ज्या 'छात्र-युवा संघर्ष वाहिनी' या संघटनेचे भाग राहिलो, जिथून सामाजिक काम करण्याची प्रेरणा मिळाली तिथे हा विचार शिकलो. त्यानंतर गडचिरोली जिल्ह्यात बांधकाम व लाकूड कामगार संघटनेमध्ये छात्र-युवा संघर्ष वाहिनीचे साथी मोहन हिराबाई हिरालाल व आदरणीय सुखदेवबाबूजी उइके यांच्यासोबत काम करताना शांततामय सत्याग्रहावरचा विश्वास वाढला. कायद्याचे ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवण्यानेच लोकांमध्ये रुजणारे काम उभे होऊ शकेल हे पटले. म्हणूनच संस्थेच्या सुरुवातीलाच गावातल्या बैठकीत 'आम्ही काही करणार नाही, आम्ही मार्गदर्शकही नाही. आपण मिळून मार्ग काढू. ते दारूबंदीचे काम असेल, महिलाअत्याचारविरोधी असेल, रोजगारासाठी असेल, पण आपण मिळून करू. त्यासाठी ज्यांचे प्रश्न आहेत त्यांनी उभे राहिले तरच होईल,' हे सांगता आले. म्हणूनच ठाणेगावच्या सत्यभामाबाई यांनी गावात दारूबंदी करण्याच्या लढाईत गावातल्या महिलांनी 'फेरी काढू, दारू काढणाऱ्यांशी बोलायला शुभदाताईना बोलावू', असे म्हटले तेव्हा 'ताईला कशाला? आपल्या गावातील दारू आपणच बंद करू शकतो.' हे म्हणाल्याचे सांगतात, तेव्हा मला समाधान वाटते.

हा आत्मनिर्भरतेचा धागा घेऊन 'आम्ही आमच्या आरोग्यासाठी'ने महिला सक्षमीकरण, ग्रामसभा सक्षमीकरण, अपंगांचे समाजधारित पुनर्वसन व सक्षमीकरण, समाजधारित शिक्षण, आरोग्य स्वयंपूर्णता या क्षेत्रात गेली ३८ वर्षे काम केलेले आहे.

**महिला सक्षमीकरण -** या शब्दाशी माझी ओळख पुस्तकातून होण्यापूर्वी बांधकाम व लाकूड कामगार संघटनेतील गावातल्या मैत्रिणी ज्या रोजगार हमी कामावर दिवसभर काम करून रात्री संघटन मजबुतीसाठी काय प्रयत्न करायचे, आपल्या मुलांसाठी शाळा कशी असावी, याचाही विचार करत होत्या, त्यांच्याकडून झाली.

जागृत आदिवासी संघटना या संघटनेसोबत जोडलेल्या, शाळेतच न गेलेल्या किंवा थोडेफार शिकलेल्या बाया शिबिरात 'आमी पोरायला आमच रगत, मास अन दूध पाजून वाढवतो, पर पोरायला नाव लागते ते बापाचे?' 'जे सरकार आम्हाला २ ऑक्टोबरला दारूबंदीचे कार्यक्रम करायला लावते, तेच सरकार दारूचे लायसन कसे देते?' हे प्रश्न विचारतात तेव्हा त्यांच्यासाठी असणारी या शब्दाची व्याख्या समजते.

स्वयंसाहाय्यता गटाचे काम सुरू करताना संस्था म्हणून आम्ही हा विचार केला की स्वयंसाहाय्यता गट फक्त आर्थिक साहाय्यपुरवठा करण्याचे माध्यम नाही तर आदिवासी ग्रामीण समुदायाचे शोषण थांबवण्याचा मार्ग आहे. या पुढच्या वाटचालीत स्पष्ट झाले की हे माध्यम स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय




सक्षमीकरणाचे साधन आहे. साधारण संस्थेच्या कामाची दहा वर्षे झाल्यानंतर स्त्रियांसोबतच्या अवलोकन शिबिरात स्वयंसाहाय्यता गट नेतृत्वातील महिला व संस्थेतील कार्यकर्ते यांनी मिळून वरीलप्रमाणे त्यांच्या दृष्टीने स्वयंसाहाय्यता गटाचे चित्र मांडले.

यातून गटांनी केलेले साध्य समजू शकते. स्त्रिया बँकेत एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून उभ्या राहिल्या. निवडणूकप्रचारात गावात येणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना 'गावाबाहेर आमचा बोर्ड आहे त्याच्यावर गटाचे नाव वाचले नाही का?' असा प्रश्न विचारू लागल्या. वनविभागात योजना मिळण्यासाठी गेल्यानंतर 'इथे काम होत नाही वरच्या ऑफिसात जा' म्हणणाऱ्या कर्मचाऱ्यांना 'तसं लिहून द्या मग जातो' म्हणण्याची हिंमत त्यांच्यात आली. महिलांची नावे घरावर लावावी या शासनआदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सात वेळा ग्रामपंचायतीत सदस्य म्हणून ठराव मांडण्याची उदाहरणे पुढे आली.

ग्रामसभेत महिलांचा सक्रिय सहभाग, वनहक्क कायद्यांतर्गत महिलांच्या नावे जमीन व घरावर नावे चढवून घेणे, गाव व परिसर पातळीवरील स्थानिक संघटनेत स्त्रियांचा सहभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांत स्त्रियांचा सहभाग हे चित्र संस्थेच्या आजवरच्या कामाचे प्रतिबिंब आहे, असे नम्रपणे म्हणावेसे वाटते.

**समुदायआधारित अपंग पुनर्वसन व सक्षमीकरण कार्यक्रम**

या मुद्याला तसा संस्थेने उशिरा हात लावला. ॲक्शन एड या आर्थिक साहाय्यता करणाऱ्या संस्थेचा कार्यक्रम म्हणून याची सुरुवात झाली. परंतु याबाबत विचार सुरू झाला तेव्हा लक्षात आले,



**महिला व वनअधिकार**



**अपगं व्यक्ती संघटना बांधणी**



**तेंदूपत्ता लिलाव प्रक्रया**

कुरखेडा तालुक्यात रोजगार हमी योजना मजूर संघटनेचे काम सुरू करणारा कार्यकर्ता अपंग होता, महिला स्वयंसाहाय्यता समूहातील तीन-चार उदाहरणे होती अपंग महिलांची; गटातील इतर महिला बचत आणि कर्ज यासाठी थकित राहिल्या, पण यांनी मात्र वेळेत पैसे भरले. आदिवासी गावात गावाने आरोग्य कर्मचाऱ्यांवर देखरेख करण्यासाठी गावातील अपंग व्यक्ती जी दुकानदारही आहे तिच्याकडे कर्मचाऱ्यांनी सही करण्याचे कॅलेंडर सोपवले. हा आमच्याच साथीदारांचा अनुभव लक्षात घेऊन त्यांना स्वयंपूर्ण होण्यासाठी-

१. अपंग प्रमाणपत्र मिळवण्यासाठी त्यांच्याद्वारा शासनाकडे संपर्क
२. कौशल्य प्रशिक्षण
३. शासकीय योजनांची माहिती व संघटन बांधणी आणि व्यवस्थापन प्रशिक्षण
४. अपंगांना आत्मनिर्भर होण्यासाठी संस्थात्मक बांधणी - ९६ अपंगांचे स्वयंसाहाय्यता गट व त्यांचे क्लस्टर फेडरेशन (Cluster federations) आणि तालुका, जिल्हा संघटन निर्मिती.

२८ जून २०२१ रोजी संगती उत्पादक कंपनीची स्थापना.

५. शिक्षित युवक-युवतींना (१८-३५) व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षणाद्वारे रोजगार मिळवून देण्यासाठी प्रशिक्षण केंद्र उभारणी. या प्रयत्नातून गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, भंडारा, नागपूर इत्यादी परिसरात ९६ स्वयंसाहाय्यता गट, १६ परिसर संघ, संगती उत्पादक कंपनीत ४११ शेअर होल्डर, असे या कामाचे स्वरूप सध्या आहे.

**ग्रामसभा सक्षमीकरण –** आदिवासीबहुल क्षेत्र असल्यामुळे सामुदायिकता हा या क्षेत्राचा स्वभाव आहे. म्हणूनच येथे काम करताना प्रत्येक मुद्याबाबत संस्थेने ग्रामसभा केंद्रस्थानी मानली आहे. आदिवासी क्षेत्र असल्यामुळे Panchyat Extension for Scheduled Area या कायद्यान्वये ग्रामसभा महत्त्वाची ठरतेच. शिवाय संस्थेच्या मूळ स्वभावाचाही हा भाग आहेच. यामुळे ग्रामसभा स्वत: निर्णय घेण्यास सक्षम होतील यासाठी संयुक्त वनव्यवस्थापन योजना, सामूहिक वनहक्क, वनउपज याबाबत कायदे व योजना, गावातील महिला व युवक यांना या कामात अधिक सक्षम करण्यासाठी हिशोब प्रशिक्षण, मेळावे; तेंदूपत्ता जे या परिसरातील लोकांचे उत्पन्नाचे महत्त्वपूर्ण साधन आहे, त्याचे संकलन व विक्री व्यवस्था समजून घेऊन त्यांना यासाठी व इतरही वनउत्पादनांच्या माध्यमाने आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणण्यासाठी सक्षम करणे यासाठी विविध संस्था, नेटवर्क यांच्या सहकार्याने प्रयत्न सुरू आहेत.

यातूनच या परिसरात होऊ घातलेल्या खनिजउत्खनन प्रक्रियांना आळा घालण्यात ग्रामसभा संघटन सक्षम होऊ शकले आहे. या प्रक्रियेत सतत अभ्यास व सर्व घटकांचा समावेश, जसे आदिवासी, गैरआदिवासी, स्त्रिया हे सूत्र महत्त्वाचे राहिले आहे.

**आरोग्य स्वयंपूर्णता**

आरंभी या मुद्यावर जिल्ह्यातील परिस्थिती व गरज यानुसार वनऔषधी प्रसार, प्रचार यापासून सुरुवात झाली. येथील पारंपरिक वैदू व दाई यांच्या सेवा जे लोक विश्वासाने घेत होते त्यांना अधिक सक्षम करण्यात आले, शिवाय आधुनिक उपचारांची गरज व आरोग्य व्यवस्थेवरील लोकांचा अधिकार लक्षात घेऊन शासकीय आरोग्ययंत्रणेची माहिती, त्याविषयक लोकांचे अधिकार व कर्तव्ये लक्षात आणून देणे; योगी औषधोपचार समजून घेणे इत्यादीविषयक प्रशिक्षण 'जन आरोग्य अभियान' या संघटनेच्या मदतीने केले. साथी या संस्थेच्या मदतीने लोकधारित देखरेख व नियोजन प्रक्रियेत सहभागी होऊन आरोग्य नियोजन गाव करू शकते हे सिद्ध केले. आता लोकांच्या सहभागाने आरोग्य नियोजन हा शासकीय यंत्रणेच्या कामाचा भाग बनला आहे.

तरीही यासोबत स्थानिक वनौषधी लोकांपर्यंत पोचवण्याचे काम 'आनंदलोक' प्रक्रियेद्वारे सुरू आहे.

कुपोषण हा आदिवासी क्षेत्राचा एक नेहमीचाच मुद्दा आहे. याबाबत 'सर्च' या संस्थेच्या साह्याने सुरुवातीला नवजातमृत्यूविषयी अभ्यास करून, प्रशिक्षण घेऊन गडचिरोली जिल्ह्यातील कोरची येथे नवजात मृत्युदर पन्नास टक्के, नागपूरमधील गरीब वस्त्यांत चाळीस टक्के कमी करण्यात यश मिळवता आले. यानंतर संस्थेने गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी, मूलचेरा, भामरागड कुरखेडा, कोरची, एटापल्ली व चंद्रपूर जिल्ह्यातील मूल, जिवती, पोंभुर्णा, बल्लारपूर, नागभीड; चंद्रपूर व यवतमाळ जिल्ह्यात वणी आणि मध्यप्रदेशच्या सिवनी जिल्ह्यात यासाठी आरोग्य विभाग, युनिसेफ व बिल्ट या सीएसआरच्या मदतीने काम केले आहे.

मागील तीन वर्षांत कोरची येथे 'कुपोषणमुक्त गाव अभियान' या प्रक्रियेअंतर्गत कोरची या आदिवासीबहुल तालुक्यातील कुपोषण चाळीस टक्के दूर करण्यात यश मिळवता आले आहे. यात माता व बालकांना पोषण व आरोग्य सुदृढ होण्यासाठी स्थानिक आहाराची माहिती देणे, आरोग्य व्यवस्थेपर्यंत त्यांना व आरोग्य व्यवस्थेला त्यांच्यापर्यंत पोचवणे; तसेच, महिलांमध्ये असलेल्या कुपोषण व ॲनिमिया या सार्वत्रिक प्रश्नाबाबत जनजागृती करणे, हे कार्य हाती घेतले. परसबाग प्रशिक्षण दिले आणि महिलांची दर तीन महिन्यांनी हिमोग्लोबिन तपासणी केली. स्वतःच्या घरातील सांदवाडीमधील भाजीपाल्याचे योग्य उपयोग केल्यामुळे त्यांच्यामधील ॲनिमियाचे प्रमाण काही प्रमाणात कमी झाले आहे. आरोग्यसेवांवर लोकाधारित देखरेख प्रक्रियेच्या विस्तारीकरणाने याला मजबुती आणली आहे.

**शिक्षणस्वयंपूर्णता**

शिक्षणव्यवस्था सुधारण्यासाठी ग्रामसभेच्या सदस्यांना शिक्षणात अपेक्षित काय यावर विचार झाला, पण पुढे जाताना हे अपूर्ण वाटू लागले. यासोबतच आदिवासी गावात शिक्षण या मुद्याचा विचार, आदरणीय दत्ताभाऊ सावळे यांच्यासोबत झाला. ग्रामीण व आदिवासी समुदायाचा आत्मसन्मान जगवणारा व ती दृष्टी देणारा शिक्षण हा एक ध्यास होता. यामुळेच संधी मिळाल्यावर मागील एका वर्षात ग्रामसभांच्या सहयोगाने मुले त्यांना विकसित करत शिकतील कशी हा प्रयत्न करत आहोत.

मुलांमध्ये उद्योजकता विकास व नागरिकता या दृष्टीने गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हापरिषद व आदिवासी विभागाच्या आश्रमशाळा यांच्यासोबत काम झाले. ज्यातून मुलांनी व शिक्षकांनीही प्रकल्पक्षेत्राबाहेर काम नेले.

गेली ३८ वर्षे संस्थेचे काम ग्रामसभा-लोकशक्ती व स्त्रिया यांना केंद्रस्थानी ठेवून सुरू आहे. काही बाबी वजा होणे आणि काही मुद्यांची बेरीज असे करत हा प्रवास सुरू आहे. लोकांना अधिक सशक्त करत त्यासाठी संसाधन केंद्र म्हणून संस्था उभी व्हावी, स्त्रियांसाठी, अपंगांसाठी आवश्यक आधार त्यांना सक्षम करण्यासाठी उपलब्ध असावा, हे पुढच्या वाटचालीसाठी स्वप्न आहे.

**– शुभदा देशमुख**
आम्ही आमच्या आरोग्यासाठी
भ्रमणध्वनी : ९१६८६५५६९३/८७६७४८००२१



डॉ. अनंत लाभसेटवार

# यशोशिखर गाठणारी यशस्विनी

**तो** ऑगस्ट २००६ मधला दिवस ती कधीच विसरणार नाही. स्वयंपाकघरात कसलं तरी काम करत असताना बाहेर गाडी थांबल्याचा आवाज कानी पडला. वाहनातून बाहेर पडणारी व्यक्ती बघून ती स्तंभित झाली. पेप्सी कंपनीचा कार्यकारी मुख्याधिकारी (CEO) स्टीव्ह राईनमुंड (Reinemund) आपल्या दारी आलेला पाहून तिच्या आश्चर्याला सीमाच उरल्या नाहीत. ती त्याच्या हाताखाली कंपनीच्या अमेरिकन शाखेची मुख्य म्हणून काम करत होती. काही काम असलं की ती ताबडतोब त्याच्या ऑफिसमध्ये जाई किंवा फोनवर बोलत असे. परंतु आज स्वारी तसं न करता थेट घरी आलेली पाहून इंद्रा न्यूयी चाट पडली.

औपचारिकता धाब्यावर ठेवून स्टीव्हनं थेट मुद्याला हात घातला. संचालक मंडळानं तिची उभ्या पेप्सी कंपनीच्या सीईओ पदी नियुक्ती केली होती. म्हणजे ती स्टीव्हची जागा पटकावणार होती. ते पद पुढेमागे आपल्याला चालून येईल याची तिला आशा होती, परंतु एवढ्या लवकर ते आपल्या पदरात पडेल असं तिला स्वप्नातही वाटलं नव्हतं. यात दोन अडचणी होत्या. एक म्हणजे तिच्यासारखे दुसरे अठरा उच्चपदस्थ अधिकारी कंपनीत काम करत होते. दुसरं म्हणजे इंद्रा महिला आणि तीदेखील रंगीत त्वचेची. तिच्या पायात दुसरी बेडी म्हणजे ती संसाराचा गाडा ओढणारी दोन मुलांची आई होती. उद्योगजगतात प्रापंचिक पाश बढतीला आडवे येतात हे जगभर खरं असतं.

या प्राप्तव्याला अनेक प्रकारे गोडी लागली होती. तो सामान्य महिलेचा व विशेषत: भारतीय नारीचा विजय तर होताच, शिवाय अतिस्पर्धात्मक जगात स्त्री पुरुषांबरोबर उभी राहू शकते याची पावतीही होती. त्यावेळी फॉर्च्युनच्या पाचशे कंपन्यांमध्ये केवळ अकरा महिला कार्यरत होत्या. त्या सगळ्या गोऱ्या असल्या तरी त्यांच्या कंपन्या पेप्सी कंपनीपेक्षा कितीतरी लहान होत्या. म्हणजे इंद्रावर पडलेली जबाबदारीही मोठी होती.

पेप्सी कंपनी खऱ्या अर्थानं बहुद्देशीय असून १८० देशांत कार्यरत होती. त्याचप्रमाणे तिची उत्पादनं जगव्यापी तर होतीच; त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे ती प्रत्येकाच्या जीवनाला स्पर्श करणारी होती. कंपनीचं पेप्सीकोला हे शीतपेय न पिणारे, पोटॅटो चिप्ससारख्या खाऱ्या पदार्थांची चव न घेणारे किंवा पिझ्झा हटमधला पिझ्झा न चाखणाऱ्या व्यक्ती विरळाच. इंद्रा कंपनीत १९९४ मध्ये दाखल झाल्यावर तिनं केलेली पहिली शिफारस म्हणजे पिझ्झा हट, कंटकी फ्राईड चिकन (KFC) व टॅको बेल ही जगभर विखुरलेली पाच हजारांहून अधिक शीघ्र उपाहारगृहं (Fast Food) विकून टाकणं. संचालक मंडळानं तिला होकार दिला व तिची प्रतिष्ठा वाढली. भारतासाठी पोटॅटो चिप्स हा नवीन प्रकार होता. आपल्या जिभेला त्याची चव जमत नव्हती म्हणून तो खारा पदार्थ बाजारात आपटला. कुणीतरी त्यात तिखट-चाट मसाला घालण्याची कल्पना सुचवली आणि कंपनीच्या उत्पादनानं एकदम गरूड भरारी घेतली.

तिच्या नियुक्तीची वार्ता जाहीर होताच भारतात व विशेषत: चेन्नईमध्ये आनंदाची कारंजी उडाली. भारतीय स्त्रीनं केलेला हा विक्रम अतुलनीय, असामान्य व अद्वितीय होता. तिचा एकदम जगातल्या सर्वाधिक प्रभावशाली महिलांच्या यादीत नंबर लागला. उद्योगविश्वात तिनं आपल्या कर्तृत्वानं लहरी उठवल्या. भारतभेटीत प्रधानमंत्र्यांकडून तिचं स्वागत केलं गेलं. २००७ मध्ये भारत सरकारनं तिला पद्मविभूषण देऊन सन्मानित केलं. आज त्या कंपनीत तीन लाख कर्मचारी असून तिचा वार्षिक खप एकोणऐंशी अब्ज डॉलर; तर नफा ७.६ अब्ज डॉलर आहे. तुलनेनं आपल्याला लाडक्या असलेल्या इन्फोसिस कंपनीत २.६ लाख कर्मचारी असून तिचा वार्षिक खप चौदा अब्ज व नफा २.६ अब्ज डॉलर आहे. इंद्रा सीईओ झाली त्या वर्षी (२००६) ही आकडेवारी लहान असली तरी पेप्सी कंपनी भारतीय कंपन्यांपेक्षा मोठी होती. याचा अर्थ नवीन सीईओच्या खांद्यावर जास्त जबाबदारी पडून तिचं नेतृत्व

करण्यास विशेष गुण व चातुर्य लागणार होतं ते आपल्यात आहे हे इंद्रानं पुढील बारा वर्षांत जगाला दाखवून दिलं. मोठ्या कंपन्यांचा सीईओ अतितणावामुळे व अतिदबावामुळे सरासरी पाच वर्षं टिकतो. त्यानंतर एक तर तो राजीनामा देतो नाही तर त्याला बाहेरचा दरवाजा दाखवण्यात येतो. इंद्रा दोन मुलांची आई असूनही तिनं या उच्चपदी बारा वर्षं काम केलं व मग स्वेच्छेनं वयाच्या ६३व्या वर्षी राजीनामा दिला. तिच्या कारकिर्दीत कंपनीची कोकाकोला कंपनीपेक्षा जास्त वाढ होऊन संचालक मंडळ, समभागधारक व वित्तविश्लेषक तिच्या कामगिरीवर कमालीचे खुश होते. आजही कोकाकोला कंपनी इंद्राच्या कंपनीपेक्षा लहान आहे. या यशस्वी वाढीत इंद्राचा खारीचा वाटा होता.

चेन्नई येथे कृष्णमूर्ती नावाच्या ब्राह्मण घरात १९५५ साली ती जन्मली. तिला एक मोठी बहीण चंद्रिका व लहान भाऊ नारायण. आजोबा ब्रिटिशांच्या काळात न्यायाधीश होते तर वडील गणितज्ञ व बँकेत काम करून सगळा पगार बायकोच्या स्वाधीन करणारे स्वच्छंद गृहस्थ. आईचं आपल्या घरट्यावर संपूर्ण राज्य. तिच्या संमतीशिवाय घरात पान हालत नसे.



इंद्रा न्यूयी

इंद्राचं शालेय शिक्षण एका ख्रिश्चन शाळेत होऊन ती मद्रास प्रेसिडेन्सी कॉलेजमधून कलाशाखेत पदवीधर (बी.ए.) झाली. या शिक्षणाच्या जोरावर नवरा मिळत असला तरी नोकरी कुणी देत नव्हतं. शिवाय इंद्रा सामान्य विद्यार्थिनी. तिला कुठल्याच विषयात प्रावीण्य मिळालेलं नव्हतं. गणितात ती कच्ची होती. तिच्या बहिणीनं सामान्य प्रवेशपरीक्षेत उत्तीर्ण होऊन इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, अहमदाबादमध्ये प्रवेश मिळवून विक्रम केला. त्याच पाऊलवाटेवर इंद्रानं वाटचाल केली आणि तिला कोलकात्याच्या पदव्युत्तर व्यवस्थापकीय संस्थेत (I.I.M.) जागा मिळाली. ही गोष्ट सोपी नव्हती. त्यावेळी मुलींसाठी संस्थेत पुरेशा सुविधा नसल्यामुळे त्यांची संख्या मर्यादित ठेवण्यात येई. अशा परिस्थितीत दोन्ही बहिणींचा नंबर लागणं हे एक भीमकृत्यच होतं.

पदवीधर झाल्यावर चूल आणि मूल हा पारंपरिक प्रश्न पुढे उभा ठाकला. तिनं चेन्नई व नंतर मुंबईत एका विदेशी कंपनीत नोकरी केली. मुंबईत उष्मा खूप म्हणून ती अनेकदा त्यापासून दिलासा मिळण्यासाठी अमेरिकन दूतवासाच्या वातानुकूलित ग्रंथालयात जात असे. तिला तिथे एका अमेरिकन साप्ताहिकात येल विद्यापीठाच्या बिझिनेस स्कूलमध्ये एमबीए पदवीसाठी अर्ज मागितल्याची जाहिरात दिसली. सहज म्हणून तिनं अर्ज केला. आम्ही प्रवेश देऊन तुझा अर्धा खर्च भरू असं उलटपत्री उत्तर आलं आणि इंद्रा पेचात पडली. तिच्या कंपनीतल्या साहेबांनी 'जा' असा सल्ला दिला. पण आईचा त्याला तीव्र विरोध होता. आपली लग्नाळू मुलगी हात पिवळे न करताच सातासमुद्रापलिकडे पाठवण्यास ती तयार नव्हती. शेवटी तिचा विरोध दूर करून व आजोबांनी आपल्या निवृत्तीनिधीतून अर्धा खर्च भरून १९७८ साली इंद्राचा अमेरिकेला जाण्याचा रस्ता मोकळा झाला.

पदवी पदरात पडण्यापूर्वीच तिला पती मिळाला. राज न्यूयी हा कानडी ब्राह्मण. तो अभियांत्रिकी क्षेत्रात एमएस पदवी प्राप्त करून शिकागो इथे नोकरी करत होता. पहिलं वर्ष संपल्यावर उन्हाळ्यात अर्थार्जन करण्यासाठी इंद्रा शिकागोला गेली आणि तिथे तिची राजशी भेट झाली. अक्षदा पडल्या. दोन वर्षांत दुसरी एमबीए पदवी मिळाल्यानंतर इंद्रा नोकरी शोधायला लागली. अनेक नोकऱ्या चालूनही आल्या. ती लवकर आई झाली. मग एका वाहनअपघातात तिच्या शरीराला इजा झाली. त्यातून बरी झाल्यावर प्रीताचा जन्म होऊन दहा वर्षं लोटल्यानंतर तारा त्यांच्या घरात आली.

प्रपंच व व्यवसाय यामधला लढा उग्र झाला. अमेरिकेत बेबीसीटर मिळणं महाकठीण. वडील कर्करोगानं गेल्यामुळे आई एकटी पडली. तिच्या अमेरिकेच्या वाऱ्या वाढल्या. तिला वाहन चालवता येत नसल्यामुळे मुलींची शाळेत ने-आण करण्याची पंचाईत झाली. नवराबायको घराबाहेर काम करताना मेणबत्ती दोन्ही टोकानं पेटवल्यासारखी स्थिती निर्माण होते. घरात वाद वाढतात. भांडणं होतात. भारताप्रमाणे नातेवाईकांचं जाळं या देशात उपलब्ध नसतं. शिवाय आईची व इंद्राच्या बालसंगोपनाच्या पद्धती वेगळ्या. आईनं तीन मुलं यशस्वीपणे वाढवली म्हणून एका अर्थानं ती मातृत्वक्षेत्रात अनुभवी होती. परंतु ते ज्ञान अमेरिकेत कालबाह्य समजण्यात आल्यामुळे दोघांमध्ये सारखा वाद सुरू होई. भाड्याचे बेबीसीटर कामावर ठेवले पण ते व्यसनग्रस्त व महाग होते. त्यांना सारखं बदलावं लागत असल्यामुळे मुलींची हेळसांड होई. इकडे इंद्राच्या ऑफिसमधली तिची जबाबदारी वाढतच गेली.

अशा तणावग्रस्त परिस्थितीतही उत्तम काम केलं म्हणून तिला पेप्सी कंपनीत पदोन्नती मिळाली. थोड्याच वर्षांत तिला पेप्सी कंपनीच्या अमेरिकन शाखेची मुख्य म्हणून पद चालून आलं. ही वार्ता कानावर घालण्यासाठी ती मोठ्या उत्सुकतेनं संध्याकाळी घरी आली. तिच्या वाहनाचा आवाज ऐकून आई गॅरेजमध्ये गेली. इंद्रानं मोठ्या अधीरतेनं आपली खुशखबर सांगण्याचा प्रयत्न केला, पण तत्पूर्वीच आई खुश न होता तिच्यावर खेकसली.

''तुझं प्रमोशन गेलं खड्ड्यात. घरात इमर्जन्सी आली. दूध संपलं आहे.'' आई इंद्राला तारस्वरात म्हणाली.

नवनिर्वाचित अध्यक्ष रात्री दहा वाजता दूध आणायला गेली. घरी आल्यावर वातावरण शांत झालं असेल असं समूजन इंद्रानं आपली खुशखबर पुन्हा आईला सांगितली.

''हे बघ इंद्रा, तू पेप्सी का कुठल्या कंपनीत भले सीईओ का काय झाली असेल, पण तू घरात येतेस तेव्हा आई व बायको होतेस हे कधी विसरू नकोस. तुझी जागा दुसरं कुणी घेऊ शकत नाही हे लक्षात ठेव.''

ते शब्द तिच्या काळजात खोलवर जाऊन भिडले. तापलेल्या सळीनं ते आपल्या काळजावर कायमचे कोरलेत असं तिला वाटलं. ते ती कधीही विसरू शकली नाही.

सारखं घराबाहेर व गावाबाहेर काम करावं लागत असल्यामुळे लहानगी तारा व्याकूळ झाली. तिनं एकदा 'प्लीज, ममी घरी ये' म्हणून पत्र लिहिलं. 'प्लीज' हा शब्द तिनं सात वेळा गिरवला होता. मोठी प्रीता उनाड झाली होती. राज लहानगीला भारतीय पद्धतीनं गणित शिकवत असे, पण ती अमेरिकन पद्धतीपेक्षा वेगळी म्हणून तारानं भोकाड पसरलं. मोठी किशोरवयात गेल्यामुळे अमेरिकन मैत्रिणींसारखं अंगप्रदर्शन करू लागली. रात्री लवकर घरी येण्याची बंधनं घातल्यामुळे ती बंडखोर झाली. हे प्रापंचिक वादळ सुरू असतानाही इंद्रानं ऑफिसच्या कामातून सुटी घेतली नाही. ती एकाच वेळी घराकडे व ऑफिसकडे ओढली जात असे. एक दिवस तिचा तोल गेला.

तिनं घोषणा केली की, 'मी राजीनामा देऊन पूर्णवेळ हाऊस वाईफ होण्याचं ठरवलं आहे.'

हे ऐकून सगळे हर्षवायूनं हवेत उड्या मारतील, आरोळ्या ठोकतील अशी तिची अपेक्षा होती. पण झालं उलटंच. हे ऐकून राजचे व मुलींचे चेहरे पडले आणि तिथे स्मशानशांतता पसरली.

''ममी, तसं करू नकोस!'' आईच्या गळ्यात पडत प्रीता म्हणाली,

''तू पेप्सी कंपनीत मोठ्या पदावर काम करतेस हे माझ्या मैत्रिणींना सांगण्यात मला मोठा अभिमान वाटतो. तू घरी बसली तर काय बोलणार?''

राजनंही दुजोरा दिला.

इंद्राला मुलींच्या शाळेत भाषणं ठोकायला अनेकदा आमंत्रणं आली होती. त्यामुळे शाळेत मुलींचं वजन वाढलं होतं.

त्या दिवशी कंपनीत काम करायला अधिकृत हिरवा झेंडा मिळाला असं इंद्राला वाटलं आणि आपण मातृत्वाची कामगिरी बजावण्यास कमी पडलो म्हणून तिच्या मनाला जी अपराधी भावना घर करून बसली होती ती कमी झाली. अर्थात लुप्त कधी झाली नाही.

इंद्रा म्हणते की स्त्रियांनी अवश्य घराबाहेर पडावं. कंपन्यांनी व सरकारनं मदतीस येऊन पगारी सुट्ट्या, बेबीसीटरच्या सुविधा व करसवलती उपलब्ध करून द्याव्यात असं आपल्या भाषणांमध्ये अधोरेखित करते.

आता तिची मोठी मुलगी पदवी शिक्षण संपवून कामाला लागली. लहानगी कॉलेजमध्ये आहे. मोठी बहीण व लहान भाऊ अमेरिकेत स्थायिक झाले. मुलींना आपल्या आईनं एवढं मोठं पद भूषवलं म्हणून कमालीचा अभिमान वाटतो. राजनंही निवृत्ती घेतली.

सीईओ झाल्यावर तिनं पगारवाढ कधीच मागितली नाही. भारतीय संस्कृतीत ते कमीपणाचं समजण्यात येतं. परंतु अमेरिकेतल्या स्त्रीवाद्यांना ते लिंगभेदाचं लक्षण वाटलं व वाद सुरू झाला. त्याला इंद्रानं विरोध दर्शवला. संचालक मंडळानं वेळोवेळी आपल्या जबाबदारीला अनुरूप अशी पगारवाढ दिली त्यामुळे आपण खुश आहोत असं ती म्हणाली. शेवटच्या वर्षी तिचा एकूण पगार व लाभ एकतीस दशलक्ष डॉलर (२.३ अब्ज रुपये) होता. तिची निव्वळ संपत्ती ऐंशी दशलक्ष डॉलर (सहा अब्ज रुपये) आहे असं म्हणतात. ती रंगीत त्वचेची, नेतृत्वगुण, द्रष्टेपणा व व्यवस्थापनचातुर्य असलेली तज्ज्ञ असल्यामुळे सध्या अनेक नामवंत कंपन्यांच्या संचालक मंडळांवर सदस्य म्हणून तिला मागणी असते.

भारतीय व्यक्ती आंतरराष्ट्रीय कंपन्यांचं नेतृत्व व सूत्रसंचालन करू शकते याचं पहिलं उदाहरण इंद्रा आहे. तिनं नवी वाट चोखाळून इतर भारतीय लोकांना मार्ग मोकळा केला. तिच्यानंतर सीईओ म्हणून सिटी ग्रुपमध्ये विक्रम पंडित (२००८), मास्टरकार्डमध्ये पुण्याचा विजय बंगा (२०१०), मायक्रोसॉफ्टमध्ये सत्या नाडेला (२०१४), गूगलमध्ये सुंदर पिचाई (२०१५) व आयबीएममध्ये अरविंद कृष्णा (२०२०) नियुक्त झाले. याची सुरुवात करण्याचं श्रेय इंद्राला द्यावं लागेल.

**इंद्रा व कमला**

दोन्ही भारतपुत्री मद्रासच्या (आजची चेन्नई) असल्या तरी त्यांची कर्तृत्वक्षेत्रं वेगळी आहेत. एक पूर्णतः भारतीय तर दुसरी निम्मी (कमलाची आई चेन्नईची). राजकारणात उतरल्यामुळे कमलाची भारताविषयीची निष्ठा अनाकलनीय, तर इंद्राची भारतीय संस्कृतीशी जोडलेली नाळ अखंडित आहे. ती शाकाहारी असून सणावाराला कुंकू, साड्या व दागिने घालत असे. पेप्सी कंपनीची सीईओ असताना ती कोट व विजार परिधान करत असे, पण तिच्या खांद्यावर नेहमी ती दुप्पटा घेत असे. खरं म्हणजे तो पेहराव तिची नाममुद्राच झाली होती.

**– अनंत लाभसेटवार**
लेखक फर्स्ट नॅशनल बँक, USAचे
१४ वर्ष Chairman of Board होते.
anantlabh@gmail.com



शरद काळे

# गोष्ट कार्बन डायऑक्साईडची

**हवेचे** घटक कोणते असतात हे शाळेत शिकवतात. नायट्रोजन (७९%) हा सर्वात मोठा घटक हवेत असतो. त्यानंतर ऑक्सिजनचा (२०.८%) क्रमांक असतो. याशिवाय हवेतील महत्त्वाचे घटक असतात आरगॉन (०.१३%), कार्बन डायऑक्साईड (०.०३%) आणि पाण्याची वाफ (प्रमाण कमी-अधिक होत राहाते). पृथ्वीवरील वातावरणातील हवेचे हे पाच घटक आहेत. या व्यतिरिक्त जे वायू किंवा घनकण वातावरणात आहेत, त्यावरून त्या ठिकाणच्या वातावरणातील प्रदूषणाची पातळी ठरते. साधारण ४६ कोटी वर्षांपूर्वी पृथ्वी निर्माण झाली तेव्हाही वातावरणातील ह्या पाच घटकांचे प्रमाण हेच होते का? हवामानबदल म्हणजे नेमके कोणते उत्तर अपेक्षित आहे? हवेतील वाढत्या हरितगृह वायूंच्या प्रमाणाविषयी ज्या उलटसुलट बातम्या येत असतात, त्यामागचे नेमके कारण काय आहे? समुद्राची पातळी वाढत आहे का? कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वाढत चालले आहे का? ऑक्सिजनचे प्रमाण कमी होत आहे का? या विविध प्रश्नांची उत्तरे आणि ह्या सर्वांचा जागतिक तापमानवृद्धीशी नेमका काय संबंध आहे याची माहिती आपण घेऊ या. ह्या सर्व प्रश्नांची उत्तरे आपल्याला नीट समजली, तर आपण का आणि कोणती काळजी घेतली पाहिजे याची कल्पना स्पष्टपणे आपल्याला येईल.

साधारण ४६ कोटी वर्षांपूर्वी पृथ्वी निर्माण झाली, त्यावेळी अतिशय तप्त असे वातावरण येथे होते. पृथ्वीची निर्मिती सूर्यापासून झाली, ह्याविषयी आता कसलीही शंका राहिलेली नाही. निर्माण झाली त्यावेळी पृथ्वी म्हणजे एक धूसर आणि अती तप्त असा गोळा होता. त्यावेळी पृथ्वीवर आकाश, वातावरण, जमीन असले काही फरक नव्हते. जसजशी पृथ्वी थंड होऊ लागली, तसतसे तेथे वातावरणनिर्मिती होऊ लागली. सुरुवातीला पृथ्वीवर नेमकी काय परिस्थिती होती याविषयी शास्त्रज्ञ जे निष्कर्ष काढतात, ते मुख्यतः खडक, माती आणि विविध प्रकारच्या जैविक आणि अजैविक अवशेषांच्या अभ्यासातून निघत असतात. जसजसे विश्लेषण होणाऱ्या नमुन्यांचे प्रमाण वाढत जाते, तसतशी आपल्या ज्ञानात भर पडत जाऊन, गूढ वाटणाऱ्या गोष्टी स्पष्ट होऊ लागतात. आधी म्हटल्याप्रमाणे सुरुवातीला जो पृथ्वीचा गोळा सूर्यापासून वेगळा झाला, त्यावेळी ते वायू आणि घनपदार्थांचे एकत्रित असे तप्त मिश्रण होते आणि वातावरण असे नव्हतेच. सर्व पृष्ठभाग वितळलेल्या अवस्थेतच होता. आईच्या गर्भाशयात जीव तयार होतो तेव्हा तो जसा फक्त मांसाचा एक गोळा असतो, तसाच हा प्रकार म्हणावयास हरकत नाही. पृथ्वी जसजशी थंड होऊ लागली, तसतसे विविध ठिकाणच्या तापमानातील फरकांमुळे कुठे कुठे ज्वालामुखीचे उद्रेक सुरू झाले, व त्यातून तप्त वायू वेगळे होऊ लागले. वातावरणनिर्मितीची ही सुरुवात म्हणावयास हरकत नाही. या सुरुवातीच्या वायूंमध्ये हायड्रोजन सल्फाईड, मिथेन आणि कार्बन डायऑक्साईड यांचा समावेश होता. कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण त्यावेळी ०.३ ते ६ टक्क्यांपर्यंत होते. जवळजवळ पाच कोटी वर्षे पृथ्वी थंड होण्याची ही प्रक्रिया सुरू होती व त्या सुमारास तिचा वितळलेल्या स्वरूपात असलेला पृष्ठभाग घनीभूत होऊ लागला. घनीभूत पृष्ठभागावर पाणी जमा होऊ लागले.

ह्यातून काही महत्त्वाचे निष्कर्ष निघतात.

- पृथ्वी निर्माण झाली त्यावेळी पाण्याची घटकद्रव्ये त्या तप्त गोळ्यात होती, तरी पाण्याचे आणि ऑक्सिजनचे स्वतंत्र अस्तित्व मात्र त्यावेळी नव्हते.
- आजच्या वातावरणातील कार्बन डायऑक्साईड हाच एकमेव नैसर्गिक घटक त्यावेळच्या वातावरणात होता. म्हणजे हाच घटक इतर सर्व घटकांना 'रिश्ते में तो हम आप सब के बाप हैं' असे म्हणू शकतो!
- सुरुवातीला मिथेन आणि हायड्रोजन सल्फाईड हे वायू वातावरणाचा भाग असले, तरी नंतर त्यांचे अस्तित्व शून्य झाले, म्हणजेच ते आजच्या वातावरणाचे नैसर्गिक घटक नाहीत.
- कार्बन डायऑक्साईड हाच जीवसृष्टीचा आधारस्तंभ आहे.

पृथ्वीच्या आजपर्यंतच्या ४६ कोटी वर्षांच्या आयुष्यात तिने कितीतरी बदल पाहिले असतील! पाच कोटी वर्षांनंतर पृथ्वी आकारास

येऊ लागली होती. त्यावेळी वातावरणात मिथेनचे प्राबल्य होते. ऑक्सिजनला स्वतंत्र असे अस्तित्व नव्हते तर तो पाणी आणि विविध ऑक्साईडच्या स्वरूपात बंदिस्त होता. महासागरांच्या पाण्यात होत असलेल्या विविध प्रकारच्या रासायनिक क्रियांमधून कार्बनयुक्त रेणूंमधून पृथ्वीवर जे आदिजीव निर्माण झाले,



त्यांना जगण्यासाठी ऑक्सिजनची गरज नव्हती, कारण त्यांची उत्पत्ती मुळातच ऑक्सिजन विरहित वातावरणात झाली होती. या आदिजीवांना अनएअरॉबिक (anaerobic) म्हणजे विना ऑक्सिजन वातावरणात वाढणारे जीव म्हणून संबोधले जाते. आजही हे आदिजीव अस्तित्वात आहेत आणि पृथ्वीवरील एकूण कारभारात महत्त्वाची भूमिका निभावीत आहेत. साधारण २७ कोटी वर्षांपूर्वी नीलहरित शैवाल (ब्ल्यू ग्रीन अलगी) अस्तित्वात आले. जरी त्यांना अलगी (algae) असे संबोधून वनस्पतीविश्वाशी साधर्म्य दर्शवले जात असले, तरी हे ह्या आदिजीवांना वनस्पती न मानता जीवाणूवर्गातच स्थान मिळाले आहे. प्रकाशसंश्लेषण (फोटोसिंथेसिस) या नैसर्गिक प्रक्रियेने ते स्वतःचे अन्न सूर्यप्रकाशाच्या मदतीने तयार करतात. याच त्यांच्या प्रक्रियेमुळे पृथ्वीवरील स्वतंत्र ऑक्सिजनची निर्मिती होऊ लागली. प्रकाशसंश्लेषणक्रियेत सूर्यप्रकाशातील ऊर्जेचे जैवऊर्जेत रूपांतर होत असतांना पाण्याचे विघटन होऊन त्यातून ऑक्सिजन मुक्त होतो, तर कार्बन डायऑक्साईड आणि पाणी यांच्यातून ग्लुकोज व मग इतर रासायनिक पदार्थांची निर्मिती होऊन जीवांची वाढ व पुनरुत्पादन होत असते. ह्या नीलहरित शैवालांनी वातावरणातील ऑक्सिजनचे प्रमाण ०.२ टक्क्यांपर्यंत वाढवले होते. साधारण तीस कोटी वर्षांपूर्वी सूर्याची तेजस्विता आजच्या तेजस्वितेच्या मानाने फक्त सत्तर टक्के होती! त्यावेळी खरे तर पृथ्वी गोठायला हवी होती, पण तसे झाले नाही! त्यावेळी वातावरणात असलेले मिथेन आणि कार्बन डायऑक्साईड हे दोन हरितगृह वायू त्यावेळी पृथ्वीचे तारणहार होते! आज आपल्याला ज्यांची प्रचंड दहशत वाटते, ते त्यावेळी पृथ्वीवर नसते, तर जीवसृष्टीची उत्क्रांती झालीच नसती! त्या दोन वायूंच्या पराक्रमामुळे वातावरणातील उष्णतेचे प्रमाण राखले जाऊन पृथ्वीला गोठणबिंदू (० डिग्री सेल्सिअस) रोखता आले. त्यावेळी हरितगृह परिणाम हा पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी परमेश्वरी अवतार होता असे मानावयास हरकत नाही.

पृथ्वीवर सजीवसृष्टी आणि ऑक्सिजन हे दोनही हातात हात घालून उत्क्रांत झाले, असे म्हटले तर फारसे वावगे ठरणार नाही. तसेच वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव या सजीवांच्या तीन सृष्टी परस्परांना पूरक असल्यामुळेच जीवसृष्टीची उत्क्रांती वेगाने तर झालीच, शिवाय उत्पद्यंते - वर्धंते - विलयंते - उत्पद्यंते - वर्धंते - विलयंते या चक्रातून आपल्याला जे नाशवंत अविनाशित्व अनुभवयास मिळते, त्यासाठी अगदी विचारपूर्वक त्या तीन सृष्टींची निर्मिती झाली यात शंका नाही. अन्नसाखळीत निर्मिती, उपभोग आणि विघटन या ज्या तीन महत्त्वाच्या सोपानांवर वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव यांची प्रतिष्ठापना झालेली आहे. ब्रह्मा, विष्णू आणि महेश हीच त्रयी आपल्याला येथे आढळून येते! जसजसे प्रकाशसंश्लेषण करणाऱ्या वनस्पतींचे प्रमाण वाढत गेले, तसतसे ऑक्सिजनचे प्रमाण वाढत गेले आणि कार्बन डायऑक्साईडचे प्रमाणही कमी झाले. महत्त्वाचे म्हणजे पृथ्वीच्या प्रदीर्घ आयुष्यातील २१ कोटी ते ४५.६ कोटी वर्षांपर्यंत वाढत्या ऑक्सिजनमुळे मिथेनचे प्रमाण कमी होत जाऊन पूर्णपणे शून्यावर आले. त्यामुळे पृथ्वीवरून निळे आणि स्वच्छ आकाश दिसू लागले. निळ्या आकाशाचे पृथ्वीवरील वय साधारण चाळीस लाख वर्षे आहे, असा निष्कर्ष यातून निघतो! ऑक्सिजनच्या वाढत्या प्रमाणामुळे माती आणि खडकांमधील लोखंडाचे ऑक्सिडेशन होत लाल मातीची निर्मितीदेखील मोठ्या प्रमाणात झाली.

सुमारे सात कोटी वर्षांपूर्वी वातावरणातील आणि महासागरांमधील ऑक्सिजनचे प्रमाण वेगाने वाढत गेले. सहा कोटी वर्षांपूर्वी वातावरणातील हे प्रमाण २०-२१ टक्क्यांपर्यंत पोहोचले. आजतागायत त्या प्रमाणात फारसा फरक पडलेला नाही. या ऑक्सिजनच्या वाढत्या प्रमाणामुळे त्या कालावधीत सजीवसृष्टीची वाढ आणि उत्क्रांती यांचाही वेग विलक्षण वाढला होता. याच कालावधीत पृथ्वीवरील जैवविविधतेतदेखील लक्षणीय वाढ झाली होती. एकूण सजीवयुगातील सर्वात अधिक जैवविविधता या काळात होती. या दरम्यान पृथ्वीवरील जे अनअरोबिक आदिजीव होते, त्यांचे क्षेत्र घटत गेले. जेथे अगदी सेंद्रिय पदार्थांनी लडबडलेल्या पाणथळ जागा होत्या, त्या ठिकाणीच त्यांचे अस्तित्व उरले. आजदेखील हे आदिजीव आपल्याला दाट जंगलातील पाणथळ जागी, भातशेतीत आणि रवंथ करणाऱ्या काही जनावरांच्या पोटांमध्ये आढळतात. त्यांचे आपल्या एकूणच परिसंस्थेतील स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. पण डम्पिंग यार्डसारख्या ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर यांची क्रियाशीलता दिसून येते. अशा ठिकाणी मिथेननिर्मितीदेखील फार मोठ्या प्रमाणावर होते. वातावरणात उष्णताशोषक म्हणून मिथेन वायूची दाहकता जबरदस्त आहे. जागतिक तापमानवृद्धीसाठी हा मिथेन जबाबदार आहे. जागतिक तापमान वृद्धी क्षमता मोजण्यासाठी कार्बन डायऑक्साईड हे एकक वापरले जाते. एक टन मिथेनमुळे होणारा हरितगृह परिणाम हा एकवीस टन कार्बन डायऑक्साईडमुळे होणाऱ्या परिणामाएवढा असतो. भारतात लाखो टन ओला कचरा डम्पिंग यार्डवर पाठवला जातो व त्यातून कित्येक हजार टन मिथेन वायू निर्माण होतो. मिथेनचे अस्तित्व वातावरणात चौदा वर्षे इतके प्रदीर्घ असू शकते. त्यामुळे प्रत्येक घराघरात ओला कचरा निर्माण होण्याचे प्रमाण कमीत कमी ठेवून, अनिवार्य अपशिष्ट पदार्थांचे खत करण्याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. आपल्याला यासाठी येणाऱ्या पिढ्यांना अधिक सजग करावे लागणार आहे. शिजवलेले अन्न वाया जाण्याचे प्रमाण आपल्या देशाइतके कुठल्याच देशात नाही. देशात अर्धपोटी राहणाऱ्या लोकांची संख्या कमी झाली

असली तरी अजूनही लक्षणीय आहे. त्यामुळे अन्न टाकून देणारी मंडळी देशात आहे, ही अतिशय लांच्छनास्पद बाब आहे. कुठेही आणि कधीही अन्न वाया जाणार नाही ही दक्षता प्रत्येकाने जागरूकतेने घेतली पाहिजे. मिथेन आणि त्यामुळे होणारी जागतिक तापमानवृद्धी कमी करण्याचा हा प्रत्येकाने करण्याचा उपाय आहे.

वातावरणातील ऑक्सिजनच्या वाढत्या प्रमाणामुळे साधारण पाच-सव्वापाच कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर केम्बरियन म्हणून प्रसिद्ध असलेली जैविक वाढ झाली. सुमारे चार कोटी वर्षांपूर्वी चार पाय असलेले महाकाय प्राणी आणि महाकाय वनस्पतीदेखील पृथ्वीवर वाढू लागल्या. त्यामुळे कार्बन डायऑक्साईड स्थिरीकरण होण्याचा वेगदेखील प्रचंड वाढला. पृथ्वीवरील सजीवांची संख्या जितकी जास्त, तेवढी अन्नाची गरज वाढत राहाते, त्यामुळे वनस्पतींच्या प्रकाशसंश्लेषणाचे प्रमाणदेखील वाढत जाते. त्यामुळे साहजिकच कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण वेगाने घटत गेले. डायनोसर्ससारख्या महाकाय प्राण्यांच्या भोजनासाठी किती अन्न लागत असेल याची आपण फक्त कल्पनाच करू शकतो. त्यामुळे पृथ्वीवरील सजीवचक्राची गती वाढणे स्वाभाविक होते. या काळात सागरी विंचू, सागरी कीटक यासारख्या सागरी जीवांचे प्रमाणदेखील प्रचंड वाढले होते. साधारण अडीच कोटी वर्षांपूर्वी ह्यातील बरेच जीव नामशेष झाले. साधारण तीन ते चार कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर ऑक्सिजनयुग होते असे म्हटले जाते. ह्याला कार्बोनीफेरस कालखंड असे संबोधले जाते.

साधारण साडेतीन कोटी वर्षांपूर्वी ऑक्सिजनचे हवेतील प्रमाण २० टक्के होते. तीन कोटी वर्षांपूर्वी हे प्रमाण ३५ टक्क्यांवर गेले होते! कार्बोनीफेरस कालखंडाच्या उत्तरार्धात पृथ्वीवर घनदाट आणि प्रचंड उंच वृक्षांचे साम्राज्य निर्माण झाले होते. तसेच दलदलीचेदेखील अनेक प्रदेश निर्माण झाले होते. दलदल म्हणजे अनअरोबिक वातावरण! म्हणजे मिथेन निर्माण होण्याचे प्रमाण खूप असते. जेव्हा मोठ्या प्रमाणावर प्राणी आणि वनस्पती जमिनीत विविध कारणांमुळे गाडल्या जातात, त्यावेळी स्थिर केलेला कार्बन डायऑक्साईड जमिनीखाली दबला जातो. केम्बरियनयुगात आणि कार्बोनीफेरस कालखंडात निर्माण झालेले महाकाय सजीव मृत झाल्यामुळे असेल किंवा भूकंपात गाडले गेल्यामुळे असेल, कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण आणखी कमी झाले आणि पृथ्वीवरील वातावरण थंड होऊ लागले. या सर्व गाडले गेलेल्या सेंद्रिय पदार्थांचे रूपांतर अतिदाबामुळे काही लक्ष वर्षांनी, इंधनमूल्य असलेल्या विविध प्रकारच्या पदार्थांमध्ये झाले. त्यामुळे कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण ०.०३ टक्क्यापर्यंत खाली आले. काही ठिकाणी हे प्रमाण दुप्पट झाल्याची नोंद आहे. पण आता आपण परत कोळसा आणि खनिज पेट्रोलियम-तेलाचा जो प्रचंड वापर करत आहोत, त्यामुळे हवेतील कार्बन डायऑक्साईडचे प्रमाण पुन्हा वाढवण्यास हातभार लावत आहोत, हे लक्षात घेऊन, म्हणूनच वैयक्तिक पातळीवर या जीवष्म इंधनाचा वापर कमी करण्यास सुरुवात केली पाहिजे. हे आपण करत नाही म्हणून जागतिक तापमानवृद्धीचा वेग आटोक्यात ठेवणे आपल्याला अवघड जात आहे. शक्य असेल तेथे सायकल वापरणे खरे तर अनिवार्य झाले आहे. सायकलीमुळे शरीरस्वास्थ्यही उत्तम राहते आणि निसर्गाचेही रक्षण होते. त्यामुळे आपण कमीत कमी जीवाष्मइंधने वापरण्याची प्रतिज्ञा करून ती पाळली पाहिजे. स्वयंचलित वाहनांमुळे नायट्रोजन ऑक्साईडसचे प्रमाणदेखील खूप वाढते. मिथेनप्रमाणे यांचीही जागतिक तापम ानवृद्धीक्षमता बरीच आहे. म्हणून त्या प्रदूषणाची पातळी कमी केलीच पाहिजे.



साधारण साडे सहा कोटी वर्षांपूर्वी उत्तर कॅनडा मध्ये नारळाची झाडे होती! उत्तर ध्रुवाजवळ आर्क्टिक महासागर गोठत नव्हता! त्याठिकाणी पाण्यात मगरीदेखील होत्या. उत्तर ध्रुवावर रेडवूड जंगले होती.

**जागतिक तापमान वाढीचे प्रत्यक्ष आणि संभाव्य परिणाम**

- जागतिक तापमान वाढीमुळे हवामानात विलक्षण बदल होत आहेत. त्यामुळे निसर्गाचा समतोल ढळू लागला आहे. या बदलामुळे सजीवसृष्टीला धोका निर्माण होऊ पाहत आहे.
- तापमानाची पातळी वाढत चालली आहे. जगात बहुतेक सर्वच ठिकाणी उष्णतेच्या लाटा येत आहेत. सन २०२० ह्या वर्षाची जगाच्या इतिहासात सर्वात अधिक गरम वर्ष म्हणून नोंद झाली आहे. गरम तापमानामुळे माणसाच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होतात. वणव्यांची संख्या वाढत चालली आहे.
- वादळांची संख्या आणि तीव्रता वाढते आहे. बंगालच्या उपसागराच्या तुलनेत अरबी समुद्रात वादळे अगदी अभावानेच होत असत. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये येथेही आता वादळे वाढली आहेत. गेल्या तीन वर्षांमध्ये कोकण भागात कधी झाले नव्हते इतके प्रचंड नुकसान सोसावे लागले आहे.
- अकाली पाऊस, ढगफुटीमुळे येणारे अकल्पित पूर, गारपिटीमुळे होणारे नुकसान या सर्वांचेच प्रमाण खूप वाढत चालले आहे.
- समुद्राची पातळी वाढत आहे. त्यामुळे मोठमोठी शहरे पाण्याखाली जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.
- स्थावर मालमत्तेचे विविध प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींमुळे नुकसान होत आहे.
- अनेक ठिकाणी पाण्याचा दुष्काळ जाणवू लागला आहे.
- जैवसृष्टीतील अनेक जीव तापमानबदलास तोंड देऊ शकत नाही, त्यामुळे ते नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.


**– शरद काळे**

भ्रमणध्वनी : ७५०६४९८२८५

sharadkale@gmail.com



राजीव श्रीखंडे

# माय नेम इज रेड - ओरहान पामुक
## My Name is Red by Orhan Pamuk

**ओरहान** पामुक हा विसाव्या शतकातील जगप्रसिद्ध नोबेल पारितोषिक विजेता तुर्की लेखक. त्याचा जन्म ७ जून १९५२ रोजी इस्तंबूल येथे एका सधन कुटुंबात झाला. ओरहानच्या वडिलांची आई Circassian होती. त्याचे प्राथमिक शिक्षण रॉबर्ट कॉलेज सेकंडरी शाळेत झालं. पुढे त्याने आर्किटेक्चरच्या शिक्षणासाठी इस्तंबूल टेक्निकल युनिव्हर्सिटीमध्ये प्रवेश घेतला. ओरहानला आर्किटेक्चरबद्दल विशेष आकर्षण असण्याचं कारण म्हणजे हा व्यवसाय त्याच्या सर्वात आवडत्या व्यवसायाशी निगडित होता – म्हणजेच चित्रकलेशी. पण ओरहाननं तीन वर्षांतच आर्किटेक्चरचे शिक्षण सोडलं ते पूर्ण वेळ लेखक होण्यासाठीच १९७६ साली The Institute of Journalism या University of Istambul च्या संलग्न संस्थेतून त्यानं पत्रकारितेची पदवी घेतली. नंतर तो वयाच्या तिसाव्या वर्षापर्यंत त्याच्या आईजवळ राहिला. या काळात त्यानं आपली पहिली कादंबरी लिहिली.

पामुकने १९७४ सालापासूनच नियमित लेखनाला सुरुवात केली. त्याची पहिली कादंबरी Darkness and Light ला १९७९ सालच्या Miliyet Press च्या कादंबरी स्पर्धेमध्ये प्रथम पारितोषिक विभागून मिळाले. हीच कादंबरी पुढे १९८२ मध्ये Mr. Cevdet Bey and His Sons या नावाने प्रसिद्ध झाली आणि तिला Orhan Kemal कादंबरी पुरस्कार १९८३ साली मिळाला. या कादंबरीत पामुकने इस्तंबूलच्या एका सधन कुटुंबाच्या तीन पिढ्यांची कथा सांगितलेली आहे. आपल्या बालपणीच्या स्थळांचा पामुकने या कादंबरीत लक्षात येण्यासारखा वापर केलेला आहे.

पामुकला त्याच्या आरंभीच्या साहित्याबद्दल बरीच आंतरराष्ट्रीय पारितोषिके मिळालेली आहेत. त्याच्या दुसऱ्या कादंबरीला म्हणजेच Silent House ला १९८४ चा Madarali कादंबरी पुरस्कार मिळाला आणि याच कादंबरीच्या फ्रेंच भाषांतराला १९९१ चा प्रतिष्ठित Prix de la dμcouverte Europeenne हा पुरस्कार मिळाला. The White house या त्याच्या १९८५ साली प्रकाशित झालेल्या प्रसिद्ध ऐतिहासिक कादंबरीला १९९० सालचे Independent Award for Foreign Fiction मिळाले आणि त्यामुळे त्याच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीत मोलाची भर पडली. १९ मे १९९१ रोजी The New York Timesने पामुकवर एक लेख प्रसिद्ध केला. या लेखाला New Star has risen in the East - Orhan Pamuk असे शीर्षक दिले होते.


पामुकला यश तसे उशिरानेच मिळाले. १९९०साली प्रसिद्ध झालेल्या त्याच्या The Black Book या कादंबरीने जागतिक वाङ्मयविश्वात खळबळ माजवून दिली आणि तुर्की वाङ्मयातले अतिशय वादग्रस्त पण तितकेच लोकप्रिय पुस्तक म्हणून या कादंबरीला वेगळेच स्थान मिळाले. वादग्रस्त विषयाची अतिशय कौशल्यपूर्ण हाताळणी हे या पुस्तकाचे खास वैशिष्ट्य. याच कादंबरीवर आधारित पुढे १९९२ मध्ये Secret Face हा जगप्रसिद्ध तुर्की दिग्दर्शक Omer Kayur यानं दिग्दर्शित केलेला चित्रपटही प्रचंड गाजला आणि या चित्रपटाची पटकथा पामुकनेच लिहिली होती. १९९४ साली पामुकच्या New Life या पाचव्या कादंबरीने तुर्की वाङ्मयात सर्वाधिक खपाचे पुस्तक म्हणून एक वेगळेच कीर्तिमान स्थापित केले. या वेळेपर्यंत पामुकची कीर्ती तुर्कस्थानमध्ये सर्वदूर पसरलेली होती, कारण तो कुर्दीश लोकांवरच्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या बुद्धिजीवी वर्गात अग्रेसर होता. याच विषयावर पामुकने १९९९ मध्ये Other Colours या नावाचा एक निबंधसंग्रह प्रकाशित केला.

पामुकच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीत त्याच्या पुढच्या कादंबरीने प्रचंड भर घातली. या कादंबरीचे नाव होते My Name is Red. या कादंबरीला प्रचंड लोकप्रियता मिळाली. याच कादंबरीबाबत

पुढे मी जरा विस्ताराने लिहिलेले आहे. या नंतरची कादंबरी होती Snow. २००४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या कादंबरीत इस्लाम आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञान यांच्यातल्या संघर्षाचे अत्यंत प्रत्ययकारी चित्रण केलेले आहे.

पामुकची पुढची कादंबरी म्हणजे २००७ साली प्रकाशित झालेली The Museum of Innocence. आदल्याच वर्षी म्हणजे २००६ ला पामुकला साहित्याचे नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले. The Museum of Innocence लिहिताना पामुकने इस्तंबूलमध्ये एक घर विकत घेतले आणि त्यात या कादंबरीत असलेल्या रोजच्या वस्तूंचे एक म्युझियमच तयार केले. Snow आणि The Museum of Innocence या दोन्ही पामुकच्या शोकान्त प्रेमकथा आहेत. पामुकची दहावी कादंबरी The Red Haired Women ही २०१६ साली प्रकाशित झाली. एका दुष्काळी प्रदेशात विहीर खणण्याचा ध्यास घेतलेल्या एका माणसाची आणि त्याच्या साहाय्यकाची कथा यात सांगितलेली आहे.

Istambul - Memories and the City या नावाचे पामुकचे एक आत्मकथन २००५ साली त्याने प्रकाशित केले. २०१९ साली पामुकने आपल्या घराच्या बाल्कनीतून इस्तंबूल शहराच्या काढलेल्या छायाचित्रांचे एक प्रदर्शन भरवले. त्याला उत्तम प्रतिसाद मिळाला.






ओरहान पामुक

ओरहान पामुकच्या लिखाणात पूर्व आणि पाश्चिमात्य मूल्यांच्या संघर्षाचा विषय आपल्याला प्रामुख्याने दिसतो. त्याच्या कादंबऱ्यांचे कथानक बहुधा अतिशय गुंतागुंतीचे असते आणि त्यांच्यातल्या व्यक्तिरेखाही अत्यंत व्यामिश्र अशाच असतात. त्याच्या लिखाणात सृजनशीलतेबद्दल मोठ्या प्रमाणात विवेचन केलेले असते, मुख्यतः चित्रकला आणि साहित्य याबद्दल. सनातनी परंपरा आणि आधुनिक मूल्ये यामधल्या चिरंतन वादाची प्रतिबिंबे आपल्याला पामुकच्या लेखनात जागोजागी दिसतात. तुर्कस्थानचा सर्वात प्रसिद्ध लेखक म्हणून त्याची ओळख जगजाहीर आहे. त्याच्या पुस्तकांची ४६ भाषांत भाषांतरे झालेली आहेत आणि आजवर त्याच्या पुस्तकांच्या दीड कोटीहून अधिक प्रती विकल्या गेलेल्या आहेत. Comparative Literature आणि Writing हे विषयही पामुक अमेरिकेच्या प्रतिष्ठित कोलंबिया विद्यापीठात अतिथी व्याख्याता म्हणून शिकवतो.

पामुकचा मोठा भाऊ सेवकेट (Sevket) हा एक प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ आहे तर त्याची सावत्र बहीण हुमेरा (Humeyra) ही एक प्रसिद्ध पत्रकार आहे. पामुकचा इतिहासकार ॲलिन ट्युरेग्यू (Aylin Tregn) हिच्याशी विवाह झाला होता, पण पुढे त्यांचा घटस्फोट झाला. त्यांना रूया (Ruya) नावाची एक मुलगी आहे.

आता मी My Name is Red या कादंबरीकडे वळतो. या कादंबरीच्या कथानकाची रूपरेषा खालीलप्रमाणे आहे.

ही कथा घडते इस्तंबूलमध्ये. इसवी सन १५९१ साली, जेव्हा ओटोमान साम्राज्याचा जगावर जबरदस्त पगडा होता. या कथानकाचा कालखंड आहे १५९१ च्या हिवाळ्यातले नऊ दिवस. ब्लॅक (Black) हा एक Minituarist चित्रकार त्याच्या काकाच्या बोलावण्यावरून जवळजवळ बारा वर्षांनी इस्तंबूलला परततो. ब्लॅकच्या काकाला ओटोमान साम्राज्याच्या सुलतानाने एक पुस्तक गुप्तपणे बनवायला सांगितलेले असते. हे पुस्तक असते रेखाचित्रांचे आणि सुलतानाची अशी इच्छा असते की ही चित्रे Frankish पद्धतीनेच काढलेली असावीत. यामुळे इस्तंबूलमध्ये धार्मिक संघर्ष होण्याची भीती असते म्हणून हे काम गुप्तपणे करायचे असते. या पुस्तकाच्या निर्मितीच्या कामात काही वेगवेगळ्या चित्रकारांचा सहभाग असतो. या कादंबरीच्या सुरुवातीलाच या पुस्तकाच्या बांधणीकाराचा खून होतो. ब्लॅक या खुनाचा तपास सुरू करतो. या पुस्तकावर काम करणारे बाकीचे काही चित्रकार या खुनाच्या बाबतीत मुख्य संशयित असतात. त्यांची नावे असतात Stork, Olive आणि Butterfly. ब्लॅकची Shekure शीही भेट होते, जिच्यामुळे तो बारा वर्षांपूर्वी इस्तंबूल सोडून परागंदा झालेला असतो. Shekure ही ब्लॅकच्या काकांची म्हणजेच Enishte ची मुलगी असते. तिचे लग्न झालेले असते आणि तिला दोन मुलेही असतात. तिचा नवरा, जो एक सैनिक असतो, तो चार वर्षे बेपत्ता असतो आणि तो परत येण्याची ती प्रतीक्षा करत असते.

पुस्तक बांधणीकाराच्या मृत्यूनंतर Shekure ला असे वाटते की तिने आता तिच्या बेपत्ता नवऱ्याला घटस्फोट देऊन दुसऱ्या कुणाशी तरी लग्न केलेले बरे. ब्लॅकला तिच्यात रस असतोच पण तिच्या दिरालाही तिच्यात रस असतो तसेच या पुस्तकाच्या कामात गुंतलेल्या एका Minituarist चित्रकारालाही.

या चित्रकारांचा कॉफीहाऊस हा अड्डा असतो. तिथे एक माणूस जो कथाकार म्हणून प्रसिद्ध असतो तो Enishteच्या पुस्तकातील चित्रांवर कथा रचून सांगतो. या कथांतून तो या पुस्तकाची टिंगलच करतो. त्यामुळे या सर्वांचे तिथल्या एका अतिरेकी संघटनेशी वैर तयार होते. या अतिरेकी संघटनेचे नेतृत्व Nusret Hoja या एका धर्मगुरूकडे असते.

पुढे Enishte चाही खून होतो, पण Shekure त्याचा मृत्यू जगापासून लपवून ठेवते आणि ब्लॅकला असे सांगते की त्याने तिच्यासाठी घटस्फोटाची व्यवस्था करावी. त्याच दिवशी संध्याकाळी Black आणि Shekure लग्न करतात आणि त्यानंतर Enishteचा दफनविधी करतात. Shekure Black ला असे सांगते की ती खऱ्या अर्थाने त्याची बायको तेव्हाच होईल जेव्हा तो Enishte चा खुनी शोधून काढेल. त्या दोघांनाही असेच वाटत असते की Enishte च्या आणि पुस्तक बांधणीकार असलेल्या Elegant चा खुनी एकच माणूस असावा.

पुढे मास्टर ओस्मान (Osman) जो सुलतानाचा प्रमुख चित्रकार असतो, तोही या खुनाच्या तपासात भाग घेतो. या तपासाचा फायदा घेऊन सुलतानाच्या प्रचंड वाचनालयातील दुर्मिळ पुस्तके तो वाचू लागतो. ब्लॅक ओस्मानला कामावर लक्ष केंद्रित करण्याची बऱ्याचदा विनंती करतो, पण त्याचा काहीच परिणाम होत नाही. ब्लॅक मग सुलतानाचे वाचनालय सोडून Shekure कडे जायला निघतो कारण त्याला असा संशय असतो की ओस्मान त्या सगळ्यांना सुलतानाच्या मुख्य अधिकाऱ्याकडे सोपवणार आणि तो त्यांचा अनन्वित छळ करून त्यांच्याकडून खोटे कबुलीजबाब घेणार. तोपर्यंत अज्ञात खुन्याच्या भीतीने Shekure ने तिच्या दिराच्या म्हणजेच हसनच्या घराचा आसरा घेतला असतो, आणि तिथे ती ब्लॅकची वाट बघत असते. ब्लॅक तिथे पोचतो. हसनचे घर सोडणे ही Shekure साठी एक मोठी समस्याच असते. पण ब्लॅकच्या मदतीने ती तिथून पलायन करण्यात यशस्वी होते.

ब्लॅकला शेवटी खुनी कोण हे कळते आणि बाकीच्या दोन चित्रकारांच्या मदतीने तो खुन्याला पकडतो. त्या झटापटीत खुनी ब्लॅकला जखमी करतो आणि हसनच्या खंजिरासह तिकडून पळ काढतो. तो चित्रकारांच्या कार्यशाळेत जातो तिथे त्याला हसन भेटतो. हसनच्या दृष्टीला तो खंजीर पडतो आणि खुन्याने Shekureला घरातून पळवून आणल्याचा हसनचा समज होतो. याचा बदला म्हणून तो खुन्याचे मस्तक धडावेगळे करतो आणि इस्तंबूल सोडून पलायन करतो.

इथे Shekure ब्लॅकची शुश्रूषा करून त्याला स्वत:चा पती म्हणून खऱ्या अर्थी स्वीकारते. कार्यशाळेत सगळ्या पुराव्यानिशी खुन्याचे मस्तकविरहित शव सापडल्यामुळे चित्रकारांच्या कार्यशाळेतील बाकी सगळ्यांवरचे खुनाचे बालंट टळते. परंतु त्यांची चित्रकला पूर्वीसारखी कधीच होत नाही. ब्लॅक आणि Shekure यांचे वैवाहिक जीवन समृद्ध होते, पण ब्लॅक खऱ्या अर्थाने कधीच पूर्ण सुखी होत नाही. पुढे ओटोमान साम्राज्याचे सुलतान कलेबाबत कर्मठ पवित्रा घेतात आणि चित्रकलेचा त्यागच करतात. इथेच ही कादंबरी संपते.

अतिशय वेगळा विषय असलेल्या या कादंबरीच्या कथानकाच्या मांडणीत पामुकने बऱ्याच अनोख्या गोष्टींचा वापर केलेला आहे. एक म्हणजे या कादंबरीतील प्रत्येक प्रकरणाचा निवेदक वेगवेगळा आहे. त्यामुळे एकाच घटनेकडे पाहण्याचा वेगवेगळा दृष्टिकोन आपल्याला कळतो आणि कथानक अधिकच अर्थपूर्ण आणि उठावदार होते. गंमत म्हणजे कादंबरीचा पहिल्या प्रकरणाचा निवेदक आहे खून झालेला माणूस – त्याचे शवच आपल्याशी बोलते. असे वेगवेगळे निवेदक असल्यामुळे कथानकाचा काळ जरी केवळ नऊ दिवसांचा असला तरी तो वेगवेगळ्या दृष्टिकोनांतून कथन केल्यामुळे आहे त्यापेक्षा अजून कितीतरी जास्त वाटतो. तसे हे कथानक गुंतागुंतीचे तर आहेच आणि कालप्रवाहाच्या अत्यंत खुबीदार वापरामुळे – कधी पुढे तर कधी मागे – कथानक अतिशय रंजक करण्यात पामुक कमालीचा यशस्वी झाला आहे. कथानकाची मांडणी पामुकने इतकी नीटनेटकी केलेली आहे की हे गुंतागुंतीचे कथानक अगदी सहजपणे आपल्यासमोर उलगडत जाते, कधीही न रेंगाळता.

पामुकची रसदार, शैलीदार कथनशैली हे कथानक आणखीच उठावदार करते. वेगवेगळ्या व्यक्तींकडून कथानकातील वेगवेगळे प्रसंग आपल्याला कळतात. पामुकच्या ओघवत्या कथनशैलीमुळे हे सगळे कथानक एकसंध झालेले आहे आणि त्यामुळे त्याची परिणामकारिकता अतिशय वाढलेली आहे. वेगवेगळ्या प्रसंगांची मालिका जोडताना पामुकने दृष्टिकोनही वेगवेगळे ठेवल्यामुळे कथानकाचे वेगवेगळे धागे आपल्यापुढे उलगडत जातात आणि त्यांचा माग ठेवण्यासाठी लक्षपूर्वक वाचन हे क्रमप्राप्तच ठरते. कथानकाच्या मुळाशी एक रहस्य आहे आणि या रहस्याची उकल पामुक अतिशय सफाईदारपणे करतो. मात्र हे करताना मानवी जीवनाच्या विविध पैलूंवर तो अतिशय नेमके भाष्यही करतो. यात परंपरा आहे, धर्म आहे, संस्कृती आहे, कला आहे; तसेच, प्रेम, श्रद्धा, सूड, द्वेष, प्रतारणा, विरह, निष्ठा हे निरनिराळे मानवी विकारदेखील आहेत. पामुकची भाष्ये ही नर्मविनोदाने भरलेली आहेत, त्यामुळे ती आणखीच प्रभावी होतात.

काळाचा मोठा कल्पक वापर केल्यामुळे पामुकने कथानकाला चांगलीच गती दिलेली आहे. या वेगवान कथानकात तो आपल्याला सहज सामावून घेतो आणि कथानकाचा गाभा रहस्यमय असल्यामुळे हा वेग आपली उत्कंठा वाढवण्यात यशस्वी ठरतो. कथानकाचा शेवटही अत्यंत नाट्यमय असल्यामुळे त्याचा आपल्यावर खोलवर परिणाम होतो. या कादंबरीत संवादांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. या संवादांचा पामुकने दोन तऱ्हेने वापर केलेला आहे. विविध व्यक्तिरेखांमधल्या संवादांतूनही कथानक पामुक लीलया पुढे नेतो आणि या विविध व्यक्तिरेखा आपल्याशी वेगवेगळा संवाद साधूनदेखील हे कथानक पुढे नेतात आणि तेही वेगवेगळ्या मितींमधून. चटपटीत, आकर्षक संवाद हे या कादंबरीचे एक खास वैशिष्ट्य आहे.

अनेक व्यक्तिरेखा असलेली ही कादंबरी आहे. आताच सांगितल्याप्रमाणे या सगळ्याचं व्यक्तिरेखा आपल्याशी या कादंबरीत मधूनमधून संवाद साधतात. त्यातून त्यांचे मनोविकार, त्यांचे स्वभावधर्म आपल्यासमोर स्पष्ट होत जातात. व्यक्तिरेखांत ज्या प्रमुख आहेत, त्यांत पुस्तक बांधणीकार Elegant Effendi

ज्याचा कादंबरीच्या प्रारंभालाच खून होतो, तरी तो आपल्याशी मृत्यूनंतरही बोलतच रहातो, Enishte हा ब्लॅकचा काका आहे ज्याच्याकडे सुलतानाने या पुस्तकाचे महत्त्वपूर्ण आणि तेवढेच गोपनीय काम सोपवलेले असते, Shekure ही Enishte ची सुंदर मुलगी जिच्या प्रेमात ब्लॅक असतो, हसन जो Shekureच्या बेपत्ता नवऱ्याचा धाकटा भाऊ असतो आणि जो Shekure च्या प्रेमात असतो, मास्टर ओस्मान जो सुलतानाच्या चित्रकाराचा प्रमुख असतो, Nusret Hoja हा एका कट्टरवादी धार्मिक पंथाचा पुढारी आहे, खुनाचा संशय असलेले तीन Minituarist चित्रकार म्हणजेच Olive, Stork, Butterfly आणि शेवटी आपला नायक ब्लॅक, जो इस्तंबूलला फार वर्षांनी परत आलाय तो आपल्या काकाला पुस्तक निर्मितीत मदत करायला. या सगळ्याच व्यक्तिरेखांमध्ये पामुकने त्याच्या विलक्षण वेगळ्याच तंत्रामुळे अतिशय गहिरे रंग भरले आहेत. या जणू जिवंत माणसांच्या भावविश्वांत पामुक आपल्याला अगदी विनासायास अडकवून टाकतो.

My Name is Red कादंबरी प्रकाशित झाली १९९८ मध्ये. प्रकाशित झाल्यानंतर या कादंबरीला लगेच उदंड यश मिळाले. जगभरच्या प्रमुख टीकाकारांनी तिची मुक्तकंठाने स्तुती केली. बहुतेकांनी या कादंबरीला modern classic म्हटले तर काहींनी या कादंबरीला The Defining Book of our Times असेही म्हटले. अनेक वाचकांच्या आणि टीकाकारांच्या मते ही कादंबरी ओरहान पामुकची सर्वोत्तम कलाकृती आहे. या कादंबरीच्या इंग्रजी भाषांतराला २००२ सालचे International Dublin Literary Award हे प्रतिष्ठित पारितोषिक मिळाले. या कादंबरीची साठहून अधिक भाषांत भाषांतरे झालेली आहेत. बीबीसीने या कादंबरीवर आधारित एका नभोनाट्याची निर्मिती केलेली आहे.

वरवर रहस्यकथा वाटणारी ओरहान पामुकची ही अजोड कलाकृती केवळ रहस्यकथेपुरती सीमित नाही. ही एक ऐतिहासिक कादंबरी आहे, असेही म्हणता येईल. परंतु या सगळ्या वर्गवारीच्या पलीकडे जाऊन कट्टर धार्मिकता आणि मुक्त कलाविष्कार यांच्यातला कधी न संपणारा, युगानुयुगे चाललेला जीवघेणा संघर्ष अतिशय समर्थपणे मांडणारी, कलेविषयी अत्यंत मार्मिक, तात्त्विक विवेचन करणारी, धर्म, रुढी, परंपरा यांचे मानवी जीवनातले खरे स्थान काय याचा तपशीलवार ऊहापोह करणारी, जागतिक साहित्यातली ही एक विलक्षण कलाकृती आहे. पामुकला नोबेल पारितोषिक मिळण्यात या कादंबरीचा सिंहाचा वाटा आहे, यात काहीच आश्चर्य नाही.

**– राजीव श्रीखंडे**
भ्रमणध्वनी : +९१ ९८२१०१७४६२
rshrikhande@yahoo.com

**मासिकाच्या मालकीबद्दल निवेदन**

**(रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स फॉर्म ४ (नियम ८ अन्वये)**

| | |
|---|---|
| प्रसिद्धीचे ठिकाण | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| प्रकाशन काळ | : मासिक |
| मुद्रकाचे नाव | : इंडिया प्रिंटिंग वर्क्स |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ |
| संपादकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |
| मालकाचे / प्रकाशकाचे नाव | : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ग्रंथाली द्वारा वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ |

मी, सुदेश राजाराम हिंगलासपूरकर असे जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरा आहे.

दि. १/३/२०२२

**चित्रगुज पश्चिमेचे**



**विजयराज बोधनकर**

# कथा तीन चित्रकारांच्या

**दु:खाचा** पाठलाग हा मानवी जीवनाचा एक भाग आहे. दुरून डोंगर साजरे दिसतात, त्यांच्या अंतरंगातही दु:ख लपलेलं असतं. पृथ्वीवरचा मानव सुखाचा शोध घेतो खरा पण शोध घेता दु:खही तितकंच हाताशी लागतं. मग तो राजा असो वा गरीब, त्याला दु:खाला सामोरं जावंच लागतं. सुख नजरेत पडतं पण दु:ख मनाच्या कोंदणात बंद असतं. त्याच्याच मग कथा तयार होतात. माणूस कुठल्याही क्षेत्रातला असो, संघर्ष त्याच्या पाचवीला पूजलेला असतो. कलेच्या क्षेत्रातला संघर्ष हा मात्र वेगळ्या जातकुळीचा असतो. अर्थकारणाच्या दिशा लवकर गवसत नाहीत. मेहनत प्रचंड असते. प्रतिस्पर्धी हजारोंनी असतात. नव्यांना शत्रू फार असतात, त्यांची दर्जेदार घोडदौडसुद्धा अनेकांना सहन होत नाही. स्वार्थ आणि अहंकार माणसासोबत प्रवास करतात.

सन्मानाची भूक भागली नाही की प्रस्थापित कलावंत फणा उगारतात. प्रत्येकाच्या अंहकाराची भक्कम पूजा करावी लागते. ते काहींना जमतं; काही त्या पायवाटेनं जात नाहीत. दु:खाची बीजं तिथे पडतात. आव्हानं स्वीकारताना आपला आर्थिक स्तर, मोठ्या वर्तुळातली ऊठबस, कधी कधी प्रस्थापितांचा न मिळणारा प्रतिसाद यानं हतबल होता होता, रखडत जाणारी प्रवासयात्रा कलेलाही संपवण्याची शक्यता निर्माण करते. सौंदर्याची निर्मिती करताना कलावंताच्या आयुष्याला कितीतरी चटक्यांनी घेरलेलं असतं. त्याचा मागोवा घेतांना मन सुन्न होत जातं. अर्थातच प्रत्येकाच्या आयुष्यातच असं घडतं असं नव्हे, पण ज्यांच्या आयुष्यात असलं काही घडतं त्यांची कलाही उंच दर्जाचीच असते; त्या कलेमागच्या चटक्यांची यात्रा कुणालाच दिसत नसते.

पश्चिमी देशांतली फक्त सुबत्ता आपण पाहतो, पण दु:खाचे मंद दिवे अंधारात मिणमिणत राहतात. त्याचा मंद प्रकाश अशा गोष्टीतून सांगण्याचा हा प्रयत्न. असे तीन चित्रकार...



**फ्रेंककॉईस बॉनविन**

या चित्रकाराचं आयुष्यही दु:खाचा पाठलागच आहे. तो चार वर्षांचा असताना शिवणकाम करणारी त्याची आई अचानक जग सोडून गेली. वडिल पोलीस ऑफिसर. त्यामुळे वडिलांनी या लहानग्या फ्रेंककॉईसला एका वृद्ध बाईच्या हवाली केलं, पण ती



**बॉनविनने साकारलेले पेंटिंग**

त्याला त्रास द्यायची, उपाशी ठेवायची. हे वडिलांच्या लक्षात आलं. वडिलांनी दुसरं लग्न केलं. त्यांना दुसऱ्या पत्नीपासून नऊ मुलं झाली. साधनसंपत्ती जेमतेम. घरखर्चावर ताण पडल्यामुळे तिची चिडचिड वाढली. ती या सावत्र मुलाला शिवीगाळ करून छळू लागली. उपाशी ठेवू लागली. परंतु गुणी फ्रेंककॉईस शांत राहून फक्त चित्र काढत राहिला. त्याचं मन चित्रांत रमवू लागला. एकदा हा गुण त्याच्या वडिलांच्या मित्रानं पाहिला. त्याचा चित्रवेग पाहून सरळ त्या मित्रानं त्याला एका ड्रॉईंग स्कूलमध्ये दाखल केलं. स्कूलची फी स्वत:च भरली. फ्रेंककॉईस तिथे मात्र सुखावला.

अशा दु:खाच्या कचाट्यात सापडलेल्या चित्रकाराचा जन्म २२ नोव्हेंबर १८१७ रोजी पॅरिसमधल्या अत्यंत सामान्य वस्तीत झाला. ती सामान्य वस्तीच पुढे पुढे त्याच्या चित्रातून उमटत राहिली. १८२८ ते १८३० पर्यंत त्यानं त्या ड्रॉईंग स्कूलमधून बाहेर पडून एकोल. डे. डेसेन या आर्ट ॲकॅडमीमध्ये प्रवेश घेतला. ते शिक्षण त्याला अपूर्णच सोडावं लागलं, कारण त्याच्या वडिलांनी त्याला तेथून काढून एका प्रिंटरकडे चक्क नोकरीला ठेवलं. फ्रेंककॉईसनं मात्र चित्रजिद्द सोडली नाही. स्वत: शिकण्याचा प्रयत्न करत राहिला. खऱ्या अर्थानं त्यानं एकलव्यासारखं शिक्षण पूर्ण केलं. त्याच्या संपर्कात चित्रकार ग्रॅनेट आला. तो एक सहकार्याचा दुवा होता. तो आपलं काम या चित्रकाराला हक्कानं दाखवून सुधारणा करत राहिला. तो त्याचा सल्लागार-गुरूच बनला.

त्याच्या चित्रशैलीमुळे चित्रसंग्रहाकांना त्याची चित्रं आवडू लागली. चित्र विकली जाऊ लागली. त्यानंतर त्यानं व्यवसायानं परीट असलेल्या बाईशी विवाह केला. तेव्हा उदरनिर्वाहसाठी त्याला पोलिसांच्या हेडक्वार्टरमध्ये नोकरीही मिळाली. १८५० पर्यंत त्यानं इमानेइतबारे नोकरी केली. याच काळात त्याला एका आजारानं ग्रासलं. थोडा बरा झाल्यानंतर त्याची तीन मोठी चित्रं सलोन नावाच्या आर्टगॅलरीत झळकली. त्याला तिसऱ्या क्रमांकाचं बक्षीस मिळालं. त्याला उत्तम वास्तववादी चित्रकार म्हणून मान्यता मिळाली. जे जीवन त्यानं अनुभवलं तेच कष्टाचं आणि दु:खाचं समाजमन त्यातून उमटलं. चित्रंसुद्धा मनाचे आरसेच असतात. त्याच्या चित्रांनी लोकांच्या मनात घर केलं. त्याला १८७० साली 'लीजन द ऑनर' या पदवीनं सन्मानीत करण्यात आलं. स्टील लाईफ आणि सामान्य माणसांचे सामान्य जीवन हेच त्याच्या चित्रांचे विषय शेवटपर्यंत राहिले. १८८९ मध्ये त्याचं ऑपरेशन झालं. पुढे तो अंध झाला आणि अंधाराला घेऊनच त्यानं हे चित्र जग सोडलं. अंधारानं त्याचा शेवटपर्यंत पाठलाग केला.

**पावेल फेडोटोव्ह**

स्वत:च्या आवडीनिवडी स्वत:ला व घरच्यांना कधीच लक्षात येत नाहीत व आवडीच्या क्षेत्राचा अभ्यास करायला न मिळता केवळ व्यावसायिक शिक्षण



मिळतं आणि मनातले छंद मग घुसमटू लागतात. त्याचा शेवट भयंकर दु:खात होतो. पावेल फ ेडोटोव्ह हा असाच दु:खाची कुंडली घेऊन जन्माला आला. पावेलचा जन्म १८१५ मध्ये मॉस्को इथे झाला. पावेल 'इंपिरिअल गार्ड्‌स'मध्ये ऑफिसर होता. सेंट पिटरबर्ग या शहरात वास्तव्याला होता. लहानपणापासून त्याला चित्रकलेची आवड होती. नोकरीत असताना त्यानं अनेकांचं व्यक्तिचित्र रेखाटलं होतं. त्याला हळुवार बासरी वाजवण्याचा छंद होता. पावेल मनानं खूपच हळवा असल्यामुळे सर्व मन चित्रातच असावं असं त्याला कायम वाटत असे, पण नोकरी सोडल्यास फक्त चित्राच्या निर्मितीवर घर चालेल का अशी भीती त्याला होती. तरीही त्याला अशी चित्रकार म्हणून अर्धवट ओळख नको होती. त्याची चित्रेच्छा बळावत गेली आणि पूर्ण वेळ आपण चित्रकलेलाच द्यायला हवा या सततच्या दबावानं शेवटी १८४४ मध्ये त्यानं नोकरीला रामराम ठोकला.

मग हिंमत करून त्यानं आधी जलरंगातील पेन्सिलीनं काम केलं. नंतर जलरंगातून चित्र रंगवली. भरपूर सराव केल्यानंतर १८४६ पासून त्यानं तैलरंगाचा वापर सुरू केला. तैलरंग त्याचं आवडतं माध्यम होऊ लागलं. त्यानं खिल्ली उडवणारे व उपहासात्मक 'न्यूली डेकोरेटेड', 'पीकी ब्राईड' आणि 'अनटाइमली गेस्ट' ही चित्रं तैलरंगातून चितारली. ही सर्व सामाजिक व राजकीय परंपरेवर टिकात्मक चित्रं होती.

त्याच्या 'मेनरस मॅरीज प्रपोजल' या चित्रानं यशाचा उच्चांक गाठला. त्या चित्रात त्याच्या विषयाची, रंगलेपनाची, इतर



फेडोटोव्हने साकारलेले पेंटिंग

कौशल्याची वाढ झालेली दिसत होती. १८४८मध्ये पीटर्सबर्गमध्ये एक भव्य चित्रप्रदर्शन भरलं होतं त्यात त्याच्या चित्राचा समावेश होता. चित्ररसिकांनी त्याच्या चित्राची स्तुती केली. त्यामुळे पावेल सुखावला. पुढे त्याचा सामाजिक लोकशाहीच्या सदस्यांच्या ग्रूपशी संबंध आला. त्यांच्या काही चळवळींत तो अडकला गेला. त्याच्यावर खटला भरला गेला. त्यात तो खूप निराश होत गेला. त्याच्या चित्रात अधिक हळव्या दु:खाचे रंग गडद होत गेले.

ज्या खटल्यात त्याला अडकवलं गेलं होतं त्यातून त्याचा त्रास वाढायला लागला आणि तो हळूहळू डिप्रेशनमध्ये गेला. याच दरम्यान त्याची प्रेयसी त्याला सोडून गेली. खटल्याचा त्रास, प्रेमभंग, सततची आर्थिक चिंता यामुळे तो चिंतीत होऊन दारूच्या नादाला लागला. खूप बायकांना लग्नाची मागणी करू लागला. या विचित्र वागणुकीमुळे त्याला पोलीसांनी अटक केली. त्याला मेंटल हॉस्पिटलमध्ये भरती करण्यात आलं. त्याचा मानसिक आजार वाढतच गेला. शेवटी त्याचे खूप हाल झाले. एकांकी पडलेला पावेल त्या वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये १८५२ साली जग सोडून गेला. शेवट दु:खात झाला.



**जे. डब्ल्यू. टनर**

जाणीव ही कलावंताची जननी असते. त्याच जाणिवेतून जन्मलेल्या कलाकृती मग अजरामर होत जातात. एक चित्रकार असाच पंचमहाभूतांच्या प्रेमात पडला. दिसतं तसं न रंगवण्यापेक्षा त्यानं वेगळ्या निसर्गरंगदेवतेचं दर्शन जगाला घडवून दिलं. रांगडा समुद्र, अग्नीचा उडालेला भडका, वादळाचं तांडव, पाण्याचा जलसंहार अशा आशयांतून त्यानं निसर्ग चितारला. समूद्राच्या वाऱ्याला समजून घेण्यासाठी त्यानं स्वत:ला शिडाला बांधून घेतलं. कानानं, डोळ्यानं, मनानं, शरीरानं त्याला समजून घेतलं. असा हा चित्रवेडा चित्रकार म्हणजे जोजेफ विल्यियम टनर. त्याचा जन्म २३ एप्रिल १७७५ रोजी लंडनला झाला. त्याचे पिता हे विग बनवणारे न्हावी होते व त्याची आई एका सामान्य खाटकाची मुलगी होती.

त्याच्या आयुष्यात वादळासारख्याच घटना घडल्या. त्याची बहीण बालपणीच वारली. त्या मृत्यूच्या झटक्यानं आईच्या मेंदूवर परिणाम झाला. ते वेड्यासारखी वागू लागली. तिच्या अशा वागण्याचा मुलांवर वाईट परिणाम होऊ नये म्हणून टनरच्या वडिलांनी त्याची रवानगी ब्रेटफोर्डला केली, जिथे त्याचा मामा राहायचा. हे शहर लंडनच्या थेम्स नदीच्या काठी वसलं होतं. याच नदीवर पुढे टनरचं पहिलं चित्र जन्माला आलं. हळूहळू टनर नदीकाठी रुळला. त्याच्या मनावर नदीकाठच्या मोहमयी वातावरणाचे संस्कार होऊ लागले. त्याची ही कला पाहून त्याच्या मामानं त्याला शाळेत घातलं. अधेमध्ये त्याचे वडील त्याची चित्रं दूकानात अभिमानानं लावून ठेवायचे....

टनरला आर्किटेक्ट व्हावं असं वाटत राहायचं, पण एका आर्किटेक्टनं त्याची चित्रकला पाहिली आणि त्याला चित्रकलेचाच रस्ता तूझ्यासाठी योग्य आहे हे सुचवलं. टनरनं आर्ट ॲक्डॅमीत प्रवेश घेतला तेव्हा त्याचं वय अवघं चौदा वर्षांचं होतं. याच काळात चितारलेली वॉटर कलरमधली चित्रं 'समर एक्झिबिशन'साठी निवडली गेली. त्यानंतर मात्र टनरनं झपाटून काम केलं. 'फिशरमॅन ॲट सी' हे चित्र ॲकॅडमीत झळकलं तेव्हा कलासमीक्षकांवर त्याच्या चित्रानं जादू केली. त्याची तुलना आता मोठमोठ्या चित्रकारांशी होऊ लागली. टनरनं बरीच चित्रं तैलरंगातूनही चितारली. बऱ्याचदा तो ऑन द स्पॉट फक्त पेन्सिलनं चितारून पूढे त्याचं भव्य प्रकटीकरण मात्र स्टुडिओतून करायचा. त्यामुळे त्याच्या मनातला वेगळा चित्रकार, वेगळ्या रंगातून प्रकट व्हायचा. त्याची चित्रं मुळातच गुढतेनं भरलेली असायची.

या चित्रांच्या वेडामुळे टनर अविवाहित राहिला. त्याचे वडील त्याचे पुढे साहाय्यक बनले. टनरला प्रवासाची आवड असल्यामुळे तो वेल्स, स्कॉटलॅन्ड, अख्खा युरोप खंड फिरल्यामुळे त्याच्या चित्राला एक नैसर्गिक जिवंतपणाची अनुभूती होती. म्हणूनच जॉन रुस्कीनसारखा ज्येष्ठ कलासमीक्षक म्हणाला, 'आतापर्यंतच्या निसर्गचित्रकारांमध्ये टनर हा सर्वश्रेष्ठ चित्रकार आहे.' असा हा टनर वय वाढू लागलं तसातसा विक्षिप्त वागू लागला. वडिलांच्या अचानक मृत्यूमुळे त्याला नैराश्याचे झटके येऊ लागले. शेवटी खचत खचतं या कलावंताला १९ डिसेंबर १८५१ रोजी हे जग सोडून पंचमहाभूतांच्या मिठीत कायमचं शिरावं लागलं.



**टनरने साकारलेले पेंटिंग**

**– विजयराज बोधनकर**

भ्रमणध्वनी : ९९२०४११८२८

vijayrajbodhankar1964@gmail.com



**प्रकाश दुधळकर**


# डॉक्टर अविनाश सुपे

**जठरांत्र शल्यचिकित्सक आणि एक उत्तम छायाचित्रकार**

The camera is an instrument that teaches people how to see without a camera.

- Dorohea Lange

**छायाचित्रण** एक अशी कला आहे जिथे प्रकाश हेच चित्र निर्मितीचे साधन असते. चित्रकला आणि छायाचित्रण यातील मुख्य फरक असा आहे, की चित्र साकारताना कलाकार कागद किंवा कॅनव्हास यावर रंगाद्वारा तसेच रेषांद्वारा विविध आकार भरत जातो. छायाचित्रणामध्ये नेमके याच्या उलट असते. निसर्गात किंवा परिसरात अनेक आकार, अनेक रंग, वेगवेगळ्या वस्तू, प्राणी सर्व काही आधीच असते. त्यातून हवा तेवढाच आकार निवडून त्यातून चित्रनिर्मिती करायची असते, मात्र त्याकरता कलाकाराची सूक्ष्म नजर आवश्यक आहे. तसेच, छायाचित्रण हे संपूर्ण प्रकाशाची संबंधित असल्याने अनुकूल प्रकाश उपलब्ध असणेही आवश्यक आहे. अन्यथा छायाचित्रण होऊच शकत नाही. यात अनेक बाबींचा संबंध येतो. छायाचित्रणाचे तंत्र आणि मंत्र आत्मसात करून केलेली चित्रनिर्मिती एखाद्या सुंदर चित्राच्या तोडीस तोड असते. अर्थात या दोन्ही कला पूर्णपणे स्वतंत्र असल्याने त्यांची तुलना न केलेली बरी. मात्र हे तंत्र आणि मंत्र नीट आत्मसात करण्यासाठी कठोर परिश्रमाची नितांत गरज आहे. हल्ली छायाचित्रणाचा अनेक क्षेत्रांत वापर होतो आहे. वृत्तपत्रांकरता किंवा प्रसारमाध्यमांसाठी करायचे छायाचित्रण, जाहिरातीसाठी, फॅशन क्षेत्रासाठी, वन्यजीव व निसर्गाचे छायाचित्रण इत्यादी. परंतु या सर्वांसाठी समान धागा म्हणजे अनुकूल प्रकाशाची उपलब्धता तसेच कॅमेऱ्याचे तंत्र आणि मंत्र याची पूर्ण जाण. काही लोक छायाचित्रण हे त्यांच्या उपजीविकेचे साधन म्हणून त्याचा उपयोग करतात, तर काही आपला उदरनिर्वाहाचा व्यवसाय सांभाळून केवळ छंद म्हणून छायाचित्रणाकडे वळले आहेत. आपल्या वैद्यकीय व्यवसायाची धुरा अत्यंत समर्थपणे पेलत असताना तेवढ्याच समर्थपणे निसर्गछायाचित्रण, वन्यजीवांचे छायाचित्रण, वैद्यकीय छायाचित्रण; तसेच, हवाई छायाचित्रणाच्या प्रकारामध्ये प्रावीण्य प्राप्त केलेले नामांकित शल्यविशारद, डॉक्टर अविनाश सुपे त्यातले एक महत्त्वाचे नाव.



डॉ. अविनाश सुपे

डॉक्टर अविनाश सुपे, वैद्यक क्षेत्रातील निष्णात जठरांत्र शल्यचिकित्सक असून, केईएम रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता आहेत. ते आपल्या दैनंदिन व्यग्र दिनक्रमातूनही रुग्णांना मार्गदर्शन करण्याकरता हमखास वेळ देतात. अशा या माणसाने डॉक्टरी व्यवसायापासून पूर्णपणे भिन्न असलेल्या गिर्यारोहण, वाइल्डलाइफ, हवाई छायाचित्रण, वैद्यकीय छायाचित्रण अशा वेगळ्या विषयांमध्ये पारंगतता प्राप्त केली आहे. डॉक्टर सुपे हे डॉक्टर रवी बापट यांचे विद्यार्थी. विद्यार्थिदशेत असताना, डॉक्टर रवी बापट यांच्यासोबत ते व्हॅली ऑफ फ्लॉवर्सला गेले होते. त्यावेळी बापटसरांनी त्यांचा कॅमेरा डॉक्टर सुपे यांना दिला आणि तुम्ही स्वच्छंदपणे फोटो काढा असे बजावले. त्याच वेळी या अद्‌भुत जादूई दुनियेत डॉ. सुपे यांचा प्रवेश झाला.



**चिली येथील येथील राष्ट्रीय उद्यानातील ग्रे ग्लेशीयर.**

त्यांनी गोपाळ बोधे यांच्यासोबत हवाई छायाचित्रणासाठी त्यांचे मदतनीस म्हणूनही काम केले. गोपाळ बोधे यांच्या हवाई छायाचित्रांचे प्रदर्शन व त्यावरील छायाचित्रणाची पुस्तके प्रकाशित करण्याच्या कामातदेखील डॉ. सुपे यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे त्यांना हवाई छायाचित्रणाची उत्तम माहिती मिळाली. मुळातच त्यांना छायाचित्रणाची आवड असल्याने प्रवासासाठी जाताना कॅमेरा सतत जवळ बाळगत. आपल्या व्यग्र दिनचर्येमधून ते आपल्या छंदासाठी काही वेळ राखून ठेवत. जसजसे ते छायाचित्रणामध्ये गुंतत गेले, तसतसे फोटोग्राफीक सोसायटी ऑफ इंडियामध्ये त्यांचे नियमित जाणे सुरू झाले. तेथे कायम वाइल्डलाइफ, स्टील लाइफ, निसर्गचित्र, मॉडेलिंग, मेडिकल, अशा विविध विषयांतील छायाचित्रणावर चर्चा होत. तेथे भारतातील अनेक उत्तम फोटोग्राफर नेहमीच येत. तेथेच त्यांची वन्यजीव फोटोग्राफर हनुमंतराव यांच्याशी गाठ पडली. त्यांनी डॉक्टर सुपे यांना बंगलोरला बोलावले. त्यांच्यासोबत व त्यांच्या मार्गदर्शनाखाली दहा-बारा दिवस दक्षिणेतील विविध जंगलांत वन्यजीवांचे छायाचित्रण करण्याचा अनुभव त्यांना घेता आला. त्यांच्याकडून छायाचित्रणातील लहानसहान बाबी शिकता आल्या. कॅमेरा आणि प्रकाशाचे तंत्र याबाबत ते सूचना करत. डॉक्टर सुपे यांना फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया यांच्यातर्फे सन २०१२ मध्ये

डॉक्टर बापटसर विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच आपल्या फावल्या वेळात विविध छंद जोपासण्यासाठी नेहमीच प्रोत्साहन द्यायचे. यातच डॉक्टर अविनाश सुपे यांच्या छायाचित्रणाची मुळे दडली आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. साधारणपणे १९९२च्या सुमारास ते छायाचित्रणाकडे गांभीर्याने पाहू लागले. त्यांनी छायाचित्रणाचे प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी प्राध्यापक श्रीकांत मलुष्टे यांच्या सत्यम छायाचित्रण संस्थेमध्ये सहा आठवड्यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला व नंतर छायाचित्रणाच्या अनेक कार्यशाळांमध्ये सहभागी होऊन इतरही अभ्यासक्रम पूर्ण केले. याच छायाचित्रणाच्या छंदातून त्यांची प्रसिद्ध छायाचित्रकार गोपाळ बोधे व अधिक शिरोडकर यांच्याशी ओळख झाली. गोपाळ बोधे हे हवाई छायाचित्रणामधील तज्ज्ञ तर अधिक शिरोडकर हे वन्यजीवांच्या छायाचित्रणामधील तज्ज्ञ. अशा दोन दिग्गज व्यक्तींचा सहवास लाभल्यामुळे त्यांना छायाचित्रणामधील कौशल्य चांगल्या प्रकारे आत्मसात करता आले. श्रीकांत मलुष्टे यांच्याकडे नियमित येणारे गोपाळ बोधे व अधिक शिरोडकर यांच्याबरोबर एक ग्रुपच तयार झाला. सुट्टीच्या दिवसांत राजस्थान, बंगलोर इत्यादी ठिकाणी निसर्गचित्रणासाठी त्यांनी खूप प्रवास केला व मनसोक्त छायाचित्रण केले. त्यानंतर बद्रिनाथ, कैलास मानसरोवर आणि अनेक छोटे-मोठे ट्रेक केले. निसर्गाच्या कुशीत विसावण्याची संधी छायाचित्रणामुळे मिळत गेली. त्यानंतर मेडिकल छायाचित्रणावरही काही पुस्तके काढली.



**नागझिरा अभयारण्यातील वाघ**

संस्थेचे मानद सदस्यत्व बहाल करण्यात आले. त्यांची फोटोग्राफिक सोसायटीशी जुळलेली नाळ अद्यापही टिकून आहे. सोसायटीच्या दरवर्षी होणाऱ्या विविध उपक्रमांना ते सवड मिळेल तशी हजेरी लावतात. फोटोग्राफिक सोसायटीचे वैशिष्ट्य म्हणजे एकदा तेथे आलेली व्यक्ती तन-मन-धनाने सोसायटीशी जोडली जाते.

डॉक्टर सुपे हे निष्ठावंत शल्यचिकित्सक असल्यामुळे नियमित कामातून थोडी उसंत मिळताच किंवा मुद्दाम वेळ काढून वैद्यकीय छायाचित्रणाची आवड जोपासतात. या फोटोंचा वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांना संदर्भ म्हणून उपयोग होतो. त्यांच्याकडे निसर्ग व वन्यजीव यांच्या फोटोंसोबत वैद्यकीय छायाचित्रांचा विपुल साठा आहे. या दुर्मिळ छायाचित्रांची माहिती रसिकांना उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने वैद्यकीय छायाचित्रणावर एक पुस्तक प्रसिद्ध करण्याचे त्यांनी ठरवले आहे. त्या दृष्टीने कामदेखील चालू आहे. वन्यजीवांचे छायाचित्रण असो की हिमालयातील किंवा अंटा अंटार्क्टिका खंडातील शून्यापेक्षाही कमी तापमानामध्ये छायाचित्रण करणे हे फारच जिकिरीचे तसेच जोखमीचे काम आहे. त्यांचे अंटार्क्टिकामधील छायाचित्रणाचे अनुभव फारच चित्तथरारक आहेत. तेथील वातावरण नेहमीच बेभरवशाचे असते. प्रकाशही कधी कधी फारच कमी असतो, तर कधी आकाश ढगांनी संपूर्ण व्यापलेले असते. बर्फाचे मोठमोठे कडे कधी आणि कसे अंगावर कोसळतील याचा अंदाज येत नाही. यातून वाट काढत छायाचित्रण करावे लागते.

स्वत:ला सांभाळता सांभाळता आपला कॅमेरा व इतर साहित्य यांनाही नीटपणे सांभाळणे हे खरेच कठीण काम आहे. थंड हवामानामुळे कॅमेऱ्याची बॅटरी डाउन होणे, कॅमेरा लॉक होणे असे अनुभव नेहमीच येत असतात. ते टाळण्यासाठी कॅमेरा व बॅटरीची खूप काळजी घ्यावी लागते. कॅमेऱ्याची बॅटरी विशिष्ट प्रकारे पॅक करून ठेवावी लागते. बऱ्याचदा दूरच्या ठिकाणी चार्जिंगसाठी सोयीपण उपलब्ध नसतात. त्यामुळे आहेत त्या बॅटऱ्या जपून वापरणे हेच केवळ आपल्या हातात असते. डिजिटल कॅमेरे येण्यापूर्वी सर्व फोटोग्राफर फिल्मवरच काम करायचे. फोटो काढून झाल्यानंतर त्यावर प्रक्रिया करेपर्यंत व त्यानंतर हाती येणारे रिझल्ट याबद्दल कमालीची उत्सुकता असे. या सर्व प्रक्रियेत थोडी जरी चूक झाली तरी, पाहिजे ते रिझल्ट मिळत नाहीत. छायाचित्रणासाठी आपण घेतलेली मेहनत व केलेला खर्च वाया जाऊ शकतो. वन्यजीवांचे छायाचित्रण करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. हेही काम जोखमीचे आहे. पूर्वी वेगवेगळ्या अभयारण्यांत जाण्यासाठी आताप्रमाणे सुविधा नव्हत्या. स्वत:च्या जबाबदारीवर कार्यक्रमाचे नियोजन करावे लागे. राहण्यासाठी चांगली जागा मिळाली तर आपले नशीब, नाहीतर मिळेल तेथे पथारी पसरायची तयारी ठेवावी लागत असे. आता विविध सोईसुविधा आहेत. अभयारण्यात खूप चांगल्या सुविधा आहेत. तसेच, अभयारण्यात प्रवाशांच्या अती संख्येमुळे वन्यजीवांना त्रास होणार नाही याचीही काळजी घेतली जाते. स्थानिक तरुणांना योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांना गाईड म्हणून कामगिरी दिली जाते. आता चांगले चांगले डिजिटल कॅमेरे व लेन्स सहज उपलब्ध असल्याने बरेच तरुण या छायाचित्रणाच्या क्षेत्रात आले आहेत व काहींनी खूप चांगले काम केलेले आहे. त्यामुळे त्यांच्या कामाचे नेहमीच कौतुकही केले जाते.




**अंटार्टिका मधील पेंग्विनची जोडी**

या क्षेत्रात नव्याने येऊ इच्छिणाऱ्या फोटोग्राफरसाठी डॉक्टर सुपे असा सल्ला देतात, की तुम्ही केलेले काम त्या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती तसेच आपले मित्र यांच्यासोबत सतत शेअर करत राहा. त्यामुळे यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या सूचना तुम्हाला अधिक सक्षम होण्यास हातभार लावतील.


कधी कधी असाही अनुभव येतो की मोबाइलच्या सुळसुळाटामुळे व त्यात उपलब्ध असलेल्या कॅमेऱ्यामुळे खूप लोक सतत फोटो काढताना दिसतात व जे लोक शिस्त पाळून, मनःपूर्वक छायाचित्रण करत असतात त्यांच्या मध्ये मध्ये हे लोक येत असतात. अशा फोटोंचा विविध समाजमाध्यमांवर महापूर आलेला दिसतो. शिवाय चांगले कॅमेरे व त्याच्या लेन्स घेणे आता बऱ्याच लोकांच्या आवाक्यातील झाले आहे. त्यामुळे कॅमेरा घेऊन वेगवेगळ्या ठिकाणी छायाचित्रणासाठी फिरत असतात. आपल्या कृतीमुळे निसर्गाचे कोणतेही नुकसान होणार नाही, त्याचबरोबर कुणाच्याही भावना दुखावल्या जाणार नाहीत या महत्त्वाच्या बाबीकडे बऱ्याचदा दुर्लक्ष होताना दिसते. प्रत्येक कलेत काही नीतीमूल्ये नेहमीच सांभाळावी लागतात. छायाचित्रणामध्ये या नीतिमूल्यांचे कसोशीने पालन होणे अत्यंत गरजेचे आहे.

**– प्रकाश दुधळकर**
AFIP, AFIP, APSI
सेवानिवृत्त उपसचिव, महाराष्ट्र शासन
माजी कोषाध्यक्ष, फोटोग्राफीक सोसायटी ऑफ इंडिया
भ्रमणध्वनी : ९०८२९५५६३०
dudhalkar@gmail.com

ग्रंथाली




शरद काळे
यांचे
मराठी आणि हिंदी
कवितासंग्रह




## विज्ञानांजली


**मराठी कवितासंग्रह**

**मूल्य ३५० रु.  सवलतीत २५० रु.**

## प्रेरणा

**हिंदी कवितासंग्रह**

**मूल्य १५० रु.  सवलतीत १०० रु.**




## ज्याच्या हाती पुस्तक

जॉन गोन्सालविस


संस्कृतिनिष्ठ लेखन

**मूल्य २५० रु.**
**सवलतीत १५० रु.**


## रोजी रोटी

विजय कसबे

मूलतभूत गरजांविषयी
घेतलेला वेध




**मूल्य ५० रु.**
**सवलतीत ३० रु.**




मृदुला भाटकर
यांची
मराठी आणि इंग्रजी
दोन पुस्तके




## हे सांगायला हवं

**मूल्य २५० रु.  सवलतीत १५० रु.**

## I must say this

**मूल्य ३५० रु.  सवलतीत २०० रु.**

## 'लाल दिव्यांची वस्ती आणि निष्पाप बालपण' या पुस्तकाचे प्रकाशन








''‘लाल दिव्याची वस्ती आणि निष्पाप बालपण’ हे रेड लाईट एरियामधील लहान मुलांच्या असुरक्षित जीवन आणि व्यथांचं जिवंत चित्र आहे. त्या वस्तीतील घातक वातावरण आणि त्यात होरपळून निघणारं बालपण यावर अत्यंत संवेदनशील आणि अभ्यासपूर्ण विवेचन यात मांडलं आहे. या मुलांना जीवनाच्या आणि शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी डॉ. राणी खेडीकर गेली सतरा वर्ष कार्य करत आहेत.'' असे प्रतिपादन डोंबिवली येथे श्रीकांत शिंदे फाऊंडेशन व साहित्ययात्रा आयोजित ग्रंथोत्सवात ‘लाल दिव्याची वस्ती व निष्पाप बालपण’ या ग्रंथाली प्रकाशित पुस्तकाचे प्रकाशनावेळी खगोलशास्त्र अभ्यासक दा.कृ. सोमण यांनी केले.

याप्रसंगी ग्रंथालीचे प्रभाकर भिडे व पुस्तकाच्या लेखिका राणी दुष्यंत खेडीकर यांनी मनोगत व्यक्त केले.

---

## 'नाही फिरलो माघारी' पुस्तकास पुरस्कार!







ग्रंथाली प्रकाशित कवी मोहन शिरसाट यांच्या ‘नाही फिरलो माघारी’ या कवितासंग्रहाला मध्य प्रदेश राज्य शासन अंतर्गत मध्य प्रदेश संस्कृती परिषदेच्या ‘मराठी साहित्य अकादमी’चा ‘कवी भा.रा. तांबे काव्य पुरस्कार, २०१८’ प्रदान करण्यात आला.

पुरस्कार स्वरूपामध्ये रोख ५१ हजार रुपये, शाल आणि सन्मानचिन्ह असे आहे. श्रेष्ठ मराठी साहित्य या अंतर्गत त्यांच्या या कवितासंग्रहाची निवड झाली आहे. या पुरस्काराबद्दल मोहन शिरसाट यांचे ग्रंथाली परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन!

# अन्य भाषकांना मराठी शिकवणारा 'माय मराठी' हा स्तुत्य उपक्रम




**'माय मराठी' कार्यक्रमप्रसंगी प्रा. विभा सुराणा, संजय कृष्णाजी पाटील (संचालक, राज्य मराठी विकास संस्था), प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू, मुंबई विद्यापीठ), मा. सुभाष देसाई (मंत्री भाषा विभाग), प्रा. डॉ. लक्ष्मीकांत देशमुख (मराठी भाषा समिती सल्लागार अध्यक्ष), प्रा. रवींद्र कुलकर्णी (प्र. कुलगुरू, मुबई विद्यापीठ) आणि प्रा. मेहेर भूत**

अन्य भाषकांना भाषिक प्रावीण्य पातळीनुसार आधुनिक आणि प्रमाणित अशा सर्वसमावेशक अभ्यासक्रमाद्वारे मराठी शिकवण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे एकमेवाद्वितीय योगदान - माय मराठी १ ते ६ पातळ्यांची दृक्श्राव्य सामग्रीसह १४ पुस्तके, एक ॲप आणि चार विशिष्ट लक्ष्यगटांसाठी चार अभ्यासक्रम (१. परिचारिका, २. रिक्षा आणि टॅक्सी चालक, ३. बँक कर्मचारी आणि ४. सरकारी अधिकारी). ही अध्ययनसामग्री म्हणजे दिग्गज मराठी भाषातज्ज्ञ व जर्मन भाषेच्या नवीनतम अध्यापन पद्धतीचे तज्ज्ञ यांच्या एकत्रित प्रयत्नांचे फलित आहे. HTML दुव्यांवर हे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

'माय मराठी' प्रकल्प हा मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाच्या प्रा. विभा सुराणा यांच्या नेतृत्वाखाली २०१२मध्ये सुरू झालेला एक नावीन्यपूर्ण आणि आंतरविद्याशाखीय प्रकल्प आहे, ज्याचा उद्देश अन्य भाषकांना मराठी शिकवणे हा आहे. पायाभूत व एकमेवाद्वितीय अशा या प्रकल्पांतर्गत भाषाशिक्षणासाठी प्रमाणित युरोपीय चौकटीनुसार अन्य भाषकांसाठी प्राथमिक स्तरापासून प्रगत स्तरापर्यंत पद्धतशीर आणि संरचित सामग्रीच्या सहा पातळ्या तयार केल्या गेल्या आहेत. इंग्रजी आणि जर्मनप्रमाणे मराठीदेखील संपन्न आणि पूर्वपरंपरा असणारी इंडो-युरोपीय भाषा आहे. ह्या भाषेचे अध्ययन करून त्यात सर्वसामान्य निजभाषकाइतके प्रभुत्व येण्याकरता किमान सहा पातळ्यांची, म्हणजेच अंदाजे ८०० तासांची आवश्यकता आहे.

मुंबई विद्यापीठाचा जर्मन विभाग गेल्या दहा वर्षांपासून मराठी भाषा शिकवण्याचा प्रकल्प (माय मराठी) राबवत आहे. माय मराठी - पातळी १ - पाठ्यपुस्तक आणि अभ्यासपुस्तक - या पुस्तकांचे प्रकाशन 'ग्रंथाली'च्या सहभागाने १३ ऑगस्ट २०१४ रोजी प्रसिद्ध अभिनेते आमिर खान यांच्या हस्ते करण्यात आले, ज्यांनी प्रकल्पाच्या अगदी सुरुवातीच्या टप्प्यावर उदारहस्ते प्रकल्पासाठी २५ लाख रुपयांची मदत केली.

त्यानंतर कोणताही निधी नसतानाही डॉ. विभा सुराणा यांच्या टीमने प्रकल्पाचे काम सुरूच ठेवले. २०१७ मध्ये मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाचा राज्य मराठी विकास संस्थेशी करार झाला. संस्थेने प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून दिला. आणि २०१७पासून राज्य मराठी विकास संस्थेच्या आर्थिक मदतीने हा प्रकल्प पुढे चालू राहिला.


प्रकल्पाचे त्रिस्तरीय कार्य : आधुनिक, कृती-आधारित आणि सर्वसमावेशक अशी अध्ययनसामग्री तयार करणे, तिचे अध्यापन करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण देणे आणि ऑफलाइन व ऑनलाइन अशा दोन्ही पद्धतींनी त्या सामग्रीचे अध्यापन करणे या तीन स्तरांवर या प्रकल्पाचे कार्य चालते. मुंबई विद्यापीठात या अभ्यासक्रमाचे अध्यापन २०१४ पासून नियमित सुरू आहे आणि आजवर तीन पातळ्यांचे अध्यापन केले गेले आहे. कोरोना प्रादुर्भाव आणि टाळेबंदीमुळे उद्भवलेल्या परिस्थितीत मुंबई विद्यापीठाच्या जर्मन विभागाने २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून ऑनलाइन माध्यमातून या अभ्यासक्रमाचे अध्यापन सुरू केले. त्यासाठी आधी इच्छुक आणि पात्र शिक्षकांना ऑनलाइन अध्यापनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

आता प्रकल्प पूर्ण झाला आहे आणि माय मराठी पुस्तकांच्या २ ते ६ पातळ्यांचे, ४ लघुअभ्यासक्रमांचे आणि माय मराठी ॲपचे प्रकाशन होत आहे.

**– प्रतिनिधी**

# 'रोजी-रोटी' पुस्तकाचे प्रकाशन

विजय कसबे लिखित आणि ग्रंथाली निर्मित रोजी-रोटी या पुस्तकाचं प्रकाशन डॉ. भालचंद्र मुणगेकर यांच्या हस्ते संपन्न झालं. या डिजिटल प्रकाशन समारंभात दीपा देशमुख व ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर सहभागी होते. यावेळी बोलताना ''एखादा कार्यकर्ता आपली लेखणी उचलतो, तेव्हा त्याला साहित्यिक वारसा किती आहे, त्याने यापूर्वी कशा पद्धतीचं लेखन केलंय, त्याची भाषा किती सौंदर्यपूर्ण आहे, हे महत्वाचं नसून काम करत असताना त्याला आलेले अनुभव, त्याची तळमळ, त्याची त्या प्रश्नाकडे/समस्येकडे पाहण्याची दृष्टी, त्याचं निरीक्षण, त्याचा अभ्यास आणि त्याने वास्तवाचा घेतलेला वेध मला महत्त्वाचा वाटतो आणि त्यातून जे उमटेल, निर्माण होईल ते अस्सलच असेल याची मला खात्री आहे. त्यामुळे 'रोजी-रोटी' हे पुस्तक म्हणजे विजय कसबे यांच्या लेखनप्रवासाची एक सुरुवात आहे, असं मी म्हणेन.'' असे दीपा देशमुख म्हणाल्या.




'रोजी-रोटी' या पुस्तकात लेखकाने रोजगार उपलब्ध व्हावेत यासाठी अनेक उदाहरणं देत काय काय करता येऊ शकेल याबद्दलही लिहिलं आहे. हे पुस्तक वाचताना लेखकाप्रमाणेच वाचणाराही लेखकाच्या भूमिकेत जाऊन विचार करू शकेल आणि तो त्याच्या कल्पकतेतून अनेक रोजगाराच्या संधी निर्माण करू शकेल हे या पुस्तकाचं यश आहे,'' त्या म्हणाल्या.

'रोजी-रोटी' या पुस्तकाच्या समर्पक शीर्षकापासून कम्युनिटी किचन उद्योगांच्या महत्त्वाविषयी डॉ. भालचंद्र मुणगेकर बोलले. ''विजय कसबे यांच्यातल्या संवेदनशीलतेमुळे कोरोनासारख्या कठीण काळातही त्यांना गरिबांचा/श्रमिकांचा विचार अस्वस्थ करत होता आणि केवळ समस्या मांडून ते थांबले नाहीत तर त्यांनी त्यावरचे उपायदेखील सांगितले आहेत. आज भारतातल्या ७० टक्के लोकांसमोर रोजी-रोटीचा प्रश्न असून तो विजय कसबेंसारख्या कार्यकर्त्यांनी आपल्या पुस्तकामधून अभ्यासपूर्ण पद्धतीनं मांडला आहे,'' असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

आरंभी ग्रंथालीच्या सुदेश हिंगलासपूरकर यांनी प्रास्ताविक केलं आणि त्यानंतर रोजी-रोटीचे लेखक/कार्यकर्ते विजय कसबे यांनी आपल्या मनोगतात कोरोनाच्या कालावधीत हे पुस्तक लिहिलं, ते वातावरण, ती परिस्थिती आणि त्यातून रोजी-रोटीच्या प्रश्नांनी घेतलेलं गंभीर रूप मांडत कम्युनिटी किचनसारखे उपक्रम सरकारने कसे राबवले पाहिजेत याविषयी सांगितलं.

अस्मिता पांडे यांनी सूत्रसंचालन केले. ●

---

# 'तेजोमयी' पुस्तकाचे प्रकाशन

'आपापसातील भेद पुसायचे तर त्यासाठी माया आवश्यक असते. सर्वात उन्नत भावना या भेद पुसून टाकणाऱ्या असतात. लीला निरगुडकर यांच्या चरित्रातून हेच दिसते', असे सांगत ज्येष्ठ मनोविकारतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांनी, 'प्रेमाचा प्रकाश हा एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीकडे पाझरत राहावा' असे आवाहन केले.

प्रसिद्ध उद्योजिका चारुशीला निरगुडकर यांनी लिहिलेल्या त्यांच्या सासुबाई लीला निरगुडकर यांच्या 'तेजोमयी' या चरित्राचे प्रकाशन मंगळवारी, १ मार्च रोजी स्वातंत्र्यवीर स्मारक येथे करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते.

'बाई घर घडवते म्हणजे नेमके काय याचा वास्तुपाठ म्हणजे हे पुस्तक' असे उद्गार प्रकाशनावेळी अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी काढले तर या पुस्तकापासून आजच्या पिढ्यांमधील आईला प्रेरणा मिळावी, अशी अपेक्षा भरत दाभोळकर यांनी व्यक्त केली. 'ग्रंथाली'चे सुदेश हिंगलासपूरकर यांनी मनोगत व्यक्त केले.

निरगुडकर कुटुंबीयांतर्फे आयोजित सोहळ्यामध्ये 'तेजोमयी' या मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषांतील पुस्तकांचे ग्रंथालीतर्फे प्रकाशन करण्यात आले. चारुशीला निरगुडकर यांची मुलाखत निवेदिका समीरा गुजर-जोशी यांनी घेतली. यानिमित्ताने ताई निरगुडकर यांच्या स्वभावाचे विविध पैलू लोकांसमोर आले. सासू-सुनेचे नाते कसे असावे, डॉ. सुधीर निरगुडकर यांच्या निरगुडकर फाऊंडेशनच्या स्थापनेचे स्रोत अशा आठवणीही त्यांनी सांगितल्या. डॉ. सुधीर निरगुडकर यांनीही आईबद्दल पुस्तक लिहिण्याचा प्रवास रसिकांसमोर मांडला. यावेळी निरगुडकर यांनीही आईबद्दल पुस्तक लिहिण्याचा प्रवास रसिकांसमोर मांडला. निरगुडकर कुटुंबीयांपैकी प्रतिभा निरगुडकर, तसेच पुढच्या पिढीतील मंदार आणि मंजिरी निरगुडकर यांनीही माई निरगुडकर यांच्या आठवणी सांगितल्या.

यावेळी आरती अंकलीकर, पं. गणपती भट, पं. सतीश व्यास, डॉ. भूषण पंडित यांनीही ताई निरगुडकरांच्या सहवासातील मायेच्या आठवणींना उजाळा दिला. तर अभिनेत्री मुक्ता बर्वे आणि अभिनेता उमेश कामत यांनी पुस्तकातील काही अंशाचे अभिवाचन केले. कार्यक्रमाची सुरेल सुरुवात सावनी रवींद्र यांनी ताई निरगुडकर यांना आवडणाऱ्या गाण्यांनी केली. याप्रसंगी भोषा विभागाचे प्रधान सचिव भूषण गगराणी, ॲड. उज्ज्वल निकम, सुबोध भावे, प्रदीप वेलणकर, ऋग्वेदी प्रधान, रामदास आणि अपर्णा पाध्ये, श्रुती सडोलीकर, पं. शशी व्यास, कौशल इनामदार आदींची उपस्थिती होती.

●

# ‘विज्ञानांजली’ आणि ‘प्रेरणा’ या मराठी व हिंदी कवितासंग्रहांचे प्रकाशन




‘डम्पिंग ग्राउंडवरील कचऱ्यामध्ये ३० टक्के प्रमाण हे अन्नाचे असते. जेव्हा आपण अन्न टाकून देतो, तेव्हा शेतकरी, आई, पृथ्वी या सर्वांचा अपमान करतो. त्यामुळे अन्न वाया न घालवता ते गरजूंपर्यंत पोहोचवा,’ असा मोलाचा सल्ला ज्येष्ठ शास्त्रज्ञ, पद्मश्री डॉ. शरद काळे यांनी विद्यार्थ्यांना दिला. अन्न वाया न घालवण्याची शपथच त्यांनी विद्यार्थ्यांना दिली.

विरार येथील विवा कॉलेजमध्ये सोमवारी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ पद्मश्री डॉ. शरद काळे यांच्या ‘प्रेरणा’ या हिंदी आणि ‘विज्ञानांजली’ या मराठी काव्यसंग्रहांचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला डॉ. शरद काळे आणि मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शोभा पाटकर हे उपस्थित होते, तर प्रमुख उपस्थिती आमदार हितेंद्र ठाकूर यांची होती.

‘आजच्या पिढीने मोबाइल आणि इंटरनेटचा वापर मनोरंजनासाठी नव्हे, तर माहिती मिळवण्यासाठी करावा, जितके खोलात जात येईल, तितके जाण्याचा प्रयत्न करा,’ असा सल्ला डॉ. काळे यांनी दिला.

डॉ. शोभा पाटकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वैज्ञानिक दृष्टी निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत, तसेच पालकांनीही त्यासाठी सहकार्य करावे, याबाबत मार्गदर्शन करावेत.

आमदार हितेंद्र ठाकूर यांनी डॉ. काळे यांच्या पुस्तकाचे प्रकाशन या ठिकाणी होणे हे वसई-विरारकरांचे भाग्य असल्याचे म्हटले. विवा व्यवस्थापन समिती व संस्थेचे मान्यवर यावेळी मंचावर उपस्थित होते. सूत्रसंचालन विवा कॉलेजच्या उपप्राचार्या प्राजक्ता परांजपे यांनी केले. ●













शब्द रुची


संपर्काचे मासिक माध्यम
३ वर्षाची एकत्रित भरल्यास १००० रुपये
२ विशेषांक व दिवाळी अंक यांच्यासह

१ एप्रिल २०२२ पासून
४०० रुपये

ग्रंथाली




चारुशीला निरगुडकर
यांची
मराठी आणि इंग्रजी
पुस्तके




## तेजोमयी

लीलाताई निरगुडकर चरित्रलेखन

मूल्य ३०० रु. सवलतीत २०० रु.

## Tejomayee

**Leelatai Nirgudkar Biography**

मूल्य ३५० रु. सवलतीत २५० रु.




## अचिंत अध्याय

**उषा परब**


प्राणी-पक्षांच्या
अनोळखी जगात
घेऊन जाणारी
दुर्मिळ कादंबरी

मूल्य ३०० रु.
सवलतीत १८० रु.

## सागरतळाशी

**सुजाता लोखंडे**

वेगवेगळ्या
धाटणीची
१३ व्यक्तिमत्त्वे




मूल्य २५० रु.
सवलतीत १५० रु.




## धडपड

**चंद्रशेखर धुरी**

शब्दांकन
डॉ. मधुमती
जोगळेकर-पवार


३५ कथांच्या
स्वरूपात लेखकाच्या
जीवनप्रवासाचे
शब्दचित्र

मूल्य ३५० रु.
सवलतीत २०० रु.

## साईड इफेक्टस्

**नीलम माणगावे**

ग्रामीण कादंबरीचा
विस्तृत पट




मूल्य ३५० रु.
सवलतीत २०० रु.




# ग्रंथपान

**चांगदेव काळे**

**संपर्क : ९८६९२०७४०३**

## अशक्य ते शक्य

**अनुराधा गोरे**




**ऑपरेशन सफेद सागर – तलवार – विजय!**

*''ज्यावेळी एखादं खतरनाक ऑपरेशन असतं किंवा युद्ध अगर युद्धसदृश परिस्थितीत आयुष्याची शाश्वती नसते, परत कुटुंबाची भेट होईल वा नाही माहीत नसतं, अशावेळी कुटुंबाला पत्र लिहायला सांगितलं जातं. सैनिक व अधिकारी सारेच असं पत्र लिहितात. ऑपरेशन संपलं आणि तो सैनिक वा अधिकारी सुरक्षित असेल तर ती पत्रं फाडून टाकली जातात. मात्र दुर्दैवानं तो परत आला नाही तर ते पत्र फॅमिलीकडे रवाना केलं जातं.''*

सन १९९९च्या मे महिन्यात कारगिलयुद्धाला तोंड फुटले. त्याचा शेवट जुलैमध्ये झाला. या युद्धाचे स्वरूप सुरुवातीच्या काळात 'युद्ध' या टोकाच्या भूमिकेचे नव्हते. पाकिस्तानचे काही घुसखोर भारताची हद्द ओलांडून हिमालयाच्या काही शिखरांवर जसे कारगिल, द्रास, बटालिक या भागांत अतिक्रमण करत आहेत, त्यांना तिथून हुसकावून लावावे अशी साधीसरळ भूमिका होती. परंतु प्रत्यक्षात नियंत्रणरेषाच ताब्यात घेण्याचा प्रकार उघड झाला, घुसखोरांऐवजी सशस्त्र सैनिकांनीच त्यांच्या इराद्याचे दर्शन घडवले, तेव्हा त्याची परिणती युद्धात झाली. पाकिस्तानचा हा नियोजनपूर्वक इरादा हाणून पाडण्यासाठी भारतीय फौजांनी जी अतुलनीय कामगिरी पार पाडली, तिचे वर्णन गौरव, अभिमान वाटावा असेच आहे, या घटनेला आता २३ वर्षे होत आलीत, तरीही त्या विजयाचा अभिमान आपल्या हृदयात कायम आहे. २६ जुलै हा आपण विजयदिवस साजरा करतो, तेव्हा कारगिलचे युद्ध आपल्या नजरेसमोर उभे राहते. त्याच्या स्मृती पुन्हा जाग्या होतात. कारगिलचा तो संघर्ष कसा लढला गेला. त्यासाठी भारतीय फौजांनी आपल्या प्राणांची बाजी कशी लावली, अतुलनीय साहस आणि शौर्याचा कस कसा पारखून घेतला, त्यावेळेची भौगोलिक परिस्थिती कशी होती, सीमा भागात असणाऱ्या शिखरांना कोणती नावे आहेत, असा मोठा पट या युद्धाच्या निमित्ताने आपल्यासमोर आला आहे, 'अशक्य ते शक्य... कारगील संघर्ष' या पुस्तकरूपात.

या पुस्तकाची विभागणी तीन विभागांत केलेली आहे. त्यामुळे त्याला सुटसुटीत असे नेमकेपण आले आहे. कारगिलयुद्ध हे काही सपाटभूमीवरील दोन शत्रूंचे समोरासमोर लढले गेलेले युद्ध नाही. द्रास सेक्टर, तोलोलिंग, कौबाल गळी आणि झुलु स्पुर, बटालिक सेक्टर, खलुबार, हनीफ सेक्टर, ककसर सेक्टर अशा वेगवेगळ्या पर्वतीय भागात दुर्गम, बिकट शिखरांवर चढाई करून खेळले गेलेले हे युद्ध आहे. या प्रत्येक ठिकाणी पाकिस्तानी सैनिकांशी मुकाबला करून ती शिखरे ताब्यात घेण्यासाठी वेगवेगळ्या सैनिकांच्या तुकड्या रवाना कराव्या लागलेल्या आहेत. सगळ्यात कहर म्हणजे पाकिस्तानी सैनिक शिखरावर असल्याने त्यांना चालून येणाऱ्या भारतीय फौजांची टेहेळणी करणे शक्य होते, तर शत्रूला चकवून त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचे खडतर आव्हान भारतीय फौजेसमोर होते. त्यामुळे यश आणि जीवितहानी व्यस्त प्रमाणावर गेली. अशा परिस्थितीत हवाई दलाची मदत आणि वादग्रस्त बोफोर्स तोफांची मदत फार उपयुक्त ठरली. त्याचवेळी भारतीय नौदलाने देखील या यशात फार मोठी कामगिरी बजावली. ज्यांना ऑपरेशन सफेद सागर आणि ऑपरेशन तलवार अशी नावे दिलेली होती. या सगळ्यांच्या सहभागामुळे कारगिल संघर्षाचा विजय साकारला गेला.

या युद्धात सगळ्याच सैनिक आणि अधिकाऱ्यांनी केलेली कामगिरी अतुलनीय होती. त्या प्रत्येकाची बटालियन वेगवेगळी होती तरी लक्ष्य एकच होते. शत्रूने बळकावलेला प्रदेश परत मिळवणे, तेही सीमारेषा न ओलांडण्याच्या हुकुमासह. त्यातले काही जिवंत परतले, काही शहीद झाले, त्यांच्या शौर्याचा सन्मान सैन्य विभागाने विविध पदके देऊन केलेला आहे. त्यांची जीवनकहाणी वाचताना खरा सैनिक आपल्यासमोर उभा असतो. जो देशप्रेमाने चिंब झालेला आहे त्याची गौरवगाथा हीच युद्धगाथा असते. त्याचे बलिदान म्हणजे एका सैनिकाचे नसते, ते असते तमाम भारतीयांच्या आकांक्षाचे प्रतीक. हा विभाग या पुस्तकाचा गाभा आहे.

तिसरा विभाग हा डायरीतील पानांचा, घरच्या माणसासाठी लिहून ठेवलेल्या पत्रांचा आहे. युद्धभूमीवर रवाना झालेला सैनिक आपल्या कुटुंबीय/आप्तांना आपले अखेरचे मनोगत व्यक्त करतो ते या पत्रातून. अशी पत्रे ज्या कुटुंबीयांकडे आहेत, त्यांचे संकलन इथे आहे. त्याची भाषा, ईर्ष्या, भावना मोजक्या आणि तितक्याच हृद्य स्वरूपातील आहे. 'मी परत येईन तेव्हा माझ्या हातात तिरंगा उंचावलेला असेल किंवा मी तिरंग्यात लपटलेला असेन.' या एका वाक्यात सगळे संदर्भ गोठून जातात.

वीरमाता अनुराधा गोरे या पुस्तकाच्या लेखिका आहेत. या पुस्तकासाठी त्यांनी जे हयात आहेत आणि ज्यांनी या युद्धात सहभाग घेतला होता. अशा अनेकांच्या भेटी होऊन संदर्भ गोळा केले आहेत. त्या त्या ठिकाणाचे नकाशे मिळवलेले आहेत. ज्यांनी या युद्धासंबंधी लिहिलेले आहे, त्यांच्या पुस्तकांचा संदर्भ म्हणून उपयोग केला आहे आणि त्याचवेळी त्या प्रदेशाची प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. कोणकोणते युनिट त्या ठिकाणी तैनात केलेले होते, त्यांची यादी सोबत जोडली आहे. विशेष म्हणजे प्रत्येक हालचालीचा वृत्तांत देताना तारखा आणि नावांचाही समावेश केलेला आहे. सैनिकी आस्थापना आणि राजकीय आदेश यांच्यातला समन्वयाची आवश्यकताही त्यांनी अधोरेखित केली आहे.

अनुराधा गोरे या सिद्धहस्त लेखिका आहेत, सैन्य आणि सैनिक हा त्यांच्या हृदयातला एक हळवा कप्पा आहे. देशभक्ती, मातृभूमी सैनिक हे त्यांच्या लेखनाचे मुख्य विषय आहेत. त्यांनी लिहिलेली पुस्तके याचं उज्ज्वल परंपरेतील आहेत. 'अशक्य ते शक्य' हे पुस्तक त्याचाच एक भाग म्हणता येईल.


शिरीष घाटे यांनी या पुस्तकाचे अंतरंग मुखपृष्ठावर साकारले आहे.

**मूल्य ४५० रुपये सवलतीत ३०० रुपये**




# ग्रंथपान

**नाटक – काही निरीक्षणे काही परीक्षणे**
**प्र.ना. परांजपे**




**नाटकाचा मिती संदर्भग्रंथ**

*''नाटक हा आपल्या सगळ्यांचा जिव्हाळ्याचा विषय. संहितावाचन असो वा रंगमंचावर सादर होणारा प्रयोग असो. त्याबाबतच्या येणाऱ्या प्रतिक्रिया या वेगवेगळ्या असतात. उत्तम–आवडले, ठीक–बरे–पूर्ण समाधान मिळाले नाही, अंहं – अजिबात आवडले नाही, या स्वरूपाच्या. यात एक प्रश्न असा असतो, या प्रतिक्रिया संहितेबाबत आहेत, की प्रयोगाबाबत, की दोन्हीहीबाबत? प्रत्येकाचा पिंड वेगळा तशा प्रतिक्रिया. यात हेही लक्षात घ्यावे लागते, की नाटक हा काही एका घटकापुरता मर्यादित असलेला आकृतिबंध नाही. त्यात संहितेला प्रकट स्वरूपात सादर करताना अनेक घटकांना सोबत घ्यावे लागते. या सगळ्यांना अनुसरून प्रतिक्रिया अपेक्षित असते. परंतु तसे घडत नाही, त्याला अनेक कारणे आहेत. ही कारणे कोणती याची माहिती आणि एकूण नाटक याविषयीचे विवेचन असलेले पुस्तक ग्रंथालीने प्रकाशित केले आहे, त्याचे नाव आहे 'नाटक – काही निरीक्षणे काही परीक्षणे'. त्याचे लेखक आहेत प्र.ना. परांजपे.''*

या पुस्तकाची मांडणी विषयानुरूप तीन विभागांत केलेली आहे. १) नाटक : काही निरीक्षणे, २) काही नाट्यप्रयोग–परीक्षणे, आणि ३) काही नाट्यपुस्तक–परीक्षणे, या तीनही विभागांत केंद्रस्थानी आहे ती समीक्षा. ही समीक्षा अर्थातच नाट्यसमीक्षा या अर्थाने पाहताना तिचेही तीन मुख्य भाग लेखकाने स्पष्ट केलेले आहेत. १) नाट्यविषयक तात्त्विक विचार, २) नाट्यसंहितांची (किंवा नाटकाच्या पुस्तकांची) समीक्षा आणि ३) नाट्यप्रयोगाची समीक्षा. पैकी 'मराठीतील नाट्यसमीक्षेतील सर्वात असमाधानकारक व उपेक्षित दालन म्हणजे नाट्यप्रयोगसमीक्षा' असे निरीक्षण लेखकाने नोंदवलेले आहे आणि याच विषयावर मान्यवरांच्या उपस्थितीत एक परिसंवाद खंडाळा येथे तीन दिवस आयोजित केलेला होता, त्या चर्चेची फलश्रुती यात दिलेली आहे. नाटकाकडे पाहण्याची दृष्टी आणि एकूण नाटक याचे सुंदर विवेचन वाचताना एक नवे दालन आपल्यासमोर उलगडत जात आहे, असे प्रकर्षाने जाणवते.

नाटक आणि एकांकिका यांच्यातील फरक स्पष्ट करताना 'एकांकिका' या संज्ञेला ते पर्यायी तरीही चपखल संज्ञा 'लघुनाटक' सुचवतात. लघुकथा, लघुनिबंध त्याप्रमाणे 'लघुनाटक' ही संज्ञा अधिक सयुक्तिक. तसेच, नाटकाला स्वत:ची गती असते. नाटक व लघुनाटक यांच्यातील भेद या गतीभोवती केंद्रित झालेला असतो, परंतु 'गती' या परिमाणाची दखल मराठी नाट्यसमीक्षेने फारशी घेतलेली नाही, असे निरीक्षण येथे नोंदवलेले आहे.

कॅथार्सिस, मेलोड्रामा, संगीत नाटक, ॲरिस्टॉटलचे पोएटिक्स यांच्याविषयीचे विचार स्वतंत्र लेखाद्वारे मांडलेले आहेत. वि.स. खांडेकर आणि वसंत कानेटकर यांचा नाटककार म्हणून झालेला प्रवासही या विभागात वाचायला मिळतो.

दुसरा भाग हा नाट्यप्रयोगांच्या परीक्षणाचा आहे. घाशीराम कोतवाल, अश्रूंची झाली फुले, अखेरचा सवाल, हे बंध रेशमाचे, कट्यार काळजात घुसली यांसारख्या सोळा नाटकांचे परीक्षण या विभागात आहे. नाट्यप्रयोगातील पात्रांची योजना, संवाद, दृश्यता, भाषावैभव, विषयाची विविधता, अभिनय असा सर्वांगीण विचार मांडताना कुठे अशी फसगत झालेली आहे, कुठे काही प्रश्न कसे अनुत्तरीत राहिले, नाटककार म्हणून त्यांचा दृष्टिकोन कसा व्यक्त झाला आहे यांच्या नेमक्या जागा त्या त्या लेखात स्पष्टपणे दाखवलेल्या आहेत.

नाट्यपुस्तक–परीक्षणे या तिसऱ्या विभागात कानेटकरांची ऐतिहासिक नाटके, एलकुंचवारांच्या कथानकमुक्त एकांकिका, नटसम्राट यासह तेरा लेख आहेत. कानेटकरांच्या ऐतिहासिक नाटकांच्या संदर्भात भाषेचा उल्लेख करून लेखक म्हणतात, ''कानेटकरांची बहुतांश पात्रे 'नमुनेदार' पातळीवर राहतात. 'व्यक्ती' होतच नाहीत. भाषेला 'व्यक्तिगत' बनवू शकणारा नाटककारच नाटकाला अतिरंजिततेच्या पलीकडे पोचवू शकतो, असे कानेटकरांच्या त्या बाबतीतल्या अपयशावरून म्हणावेसे वाटते.''

'नाटक' याच विषयावर समग्रपणे विचार मांडणारे हे पुस्तक नाट्यरसिक व नाट्यअभ्यासक यांच्यासाठी उत्तम संदर्भग्रंथ ठरावे. यात समावेश असलेले सर्व लेख सत्यकथा, मनोहर, सोबत यासारख्या दर्जेदार नियतकालिकांत यापूर्वी प्रसिद्ध झालेले आहेत. लेखांत व्यक्त झालेले विचार हे अनेक संदर्भांनी अलंकृत झालेले आहेत. त्यात स्पष्टपणा आणि अभ्यास आहेच, त्याचबरोबर जे मर्यादेच्या कक्षांना झुगारणारे दिसले त्यावर बोट ठेवताना इजा होणार नाही याचीही त्यांनी खबरदारी घेतलेली आहे.


या पुस्तकाला नाटककार महेश एलकुंचवार यांची प्रस्तावना लाभलेली आहे. ही प्रस्तावना म्हणजे प्र.ना. परांजपे आणि नाटक यांच्यावरील सुंदर अभ्यासनीय असा एक लेखच म्हणता येईल. ते लिहितात, 'ह्या पुस्तकातले सर्वच विवेचन कमालीच्या प्रवाही, सुंदर, सुलभ भाषेत आहे. अगदी अनोळखी संकीर्ण वाङ्मयीन कल्पनाही ते ज्या सहजगतीने सांगतात त्याचे वाचन न थांबता करता येते.'

मुखपृष्ठावर रंगमंच आणि प्रकाशयोजना यांची नेपथ्याच्या दृष्टिकोनातून केलेली योजना आशयाच्या अंतरंगाशी घेऊन जाते. गिरीश सहस्रबुद्धे यांची कल्पकता सहजपणे मनाला भावते.

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २०० रुपये**

# ग्रंथपान

**भारतीय अध्यात्मशास्त्र**
**गीता आणि विपश्यना**
**जनार्दन शां. संखे**



**जन्ममृत्यूचा भवसागर तरून जाण्यासाठीची उपदेशनौका**

*''कुठल्यातरी कारणाने दु:ख होते तेव्हा ते भोक्ताभावाने भोगल्याने दु:खाचे संवर्धन होते, परंतु त्याला सामोरे गेल्यास, साक्षीभाव ठेवल्यास दु:ख कमी होते. साधनेदरम्यान दु:खद संवेदना अनुभवताना तिच्याकडे तटस्थपणे, साक्षीभावाने पाहिल्यास म्हणजे भोक्ताभाव ठेवला नाही तर ती पीडा किंवा दु:ख हळूहळू कमी होत जाऊन पूर्णपणे संपलेले असते हे प्रत्यक्ष साधनेदरम्यान अनुभवले आहे.''*

सुख आणि दु:ख या दोन संकल्पना प्रत्येकाच्या आयुष्याला व्यापून असतात. सुख ही आनंददायी अनुभूती ठरते. प्रत्येक जण त्याच संकल्पनेचा पाठपुरावा करताना दिसतो. दु:ख ही या नात्याची दुसरी बाजू आहे. सुखी नाही तो दु:खी, त्यापासून चार हात दूर राहण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न असतो तो त्यामुळेच. या दु:खाचे मूळ कुठे आहे, याचा शोध घेतला तर येऊन थांबतो. 'तृष्णा' आणि 'आसक्ती' यांच्यापाशी. या तृष्णा चार प्रकारच्या असतात. पहिली आसक्ती तृष्णेची. दुसरी, 'मी' आणि 'माझे'बद्दल. तिसरी, आहे आपले तत्त्वज्ञान, दैवत, परंपरा, आणि चौथी, आपली कर्मभाडे, रीतीरिवाज. या चार आसक्ती आपल्या दु:खाचे मूळ आहे. आपल्याला सुख हवे असेल तर हे मूळ दूर करणे अपरिहार्य ठरते.

हे मूळ दूर करणे शक्य आहे का आणि असेल तर ते कसे, असा प्रश्न त्यातून निर्माण होतो. तर या प्रश्नाचे निराकरण आपल्याला सापडेल. 'भारतीय अध्यात्मशास्त्र–गीता आणि विपश्यना' या पुस्तकात. या पुस्तकाचे लेखक आहेत जनार्दन शां. संखे. संखे हे चार्टर्ड इंजिनीयर आर्किटेक्ट आहेत. कन्सल्टिंग इंजिनीयर आणि बिल्डिंग बांधकाम हा त्यांचा व्यवसाय आहे. काही काळ लेक्चरर म्हणूनही त्यांनी सेवा केलेली आहे.

पुस्तकाच्या शीर्षकावरूनच लक्षात येईल, अध्यात्म, गीता आणि विपश्यना असे तीन विषय यात आलेले आहेत. यांच्याविषयी लिहिण्याचा उद्देश लेखकाने स्वानुभवावर नमूद केलेला आहे, 'गीताउपदेश व विपश्यनासाधना म्हणजे अध्यात्म व योगशास्त्राने मला जे समृद्ध जीवन अनुभवायला मिळाले ते सर्वांना मिळावे व ते कसे मिळाले ते वाचकापर्यंत न्यावे.' समृद्ध जीवन म्हणजे भौतिक सुख असताना–नसताना शरीर निरोगी आणि मन शांत व समाधानी असेल तर ते समृद्ध जीवन अर्थातच त्यासाठी दोन महत्त्वाची साधने आहेत, गीता आणि विपश्यना. या दोन्हीचा संबंध आहे तो मनाशी. मन हे चंचल आणि तितकेच स्वैर असते. शंका–समाधान–स्थैर्य या अवस्थांतून मनाला वळणावर आणले जाणे आवश्यक ठरते. अर्जुनाची संभ्रमावस्था आणि ती दूर करण्यासाठी श्रीकृष्णाने केलेला उपदेश यात अंतर्भूत आहे अध्यात्म. हे अध्यात्म नीट समजून घेतले नाही तर मनाची संभ्रमावस्था दूर होणार नाही. आणि ती दूर झाली नाही तर मनाच्या तळाशी असणारे दु:खही अज्ञानामुळे कायम राहील. त्यामुळे अध्यात्म समजणे आणि त्याप्रमाणे वागणे म्हणजेच आध्यात्मिक किंवा धर्माने वागणे होय.

गीता आपल्याला परिचित झाली ती ज्ञानेश्वरीमुळे. तिच्यातले अठरा अध्याय हे वेगवेगळे योग आहेत. मानवी जीवन, अध्यात्म, सुखदु:ख यांचे विवेचन उपदेशाच्या स्वरूपात मांडलेले आहे. तरीही शेवटी ते मनाच्या अवस्थेशी येऊन थांबलेले आहे. मन संयमित असणे, अध्यात्म समजून घेणे यावर अधिक भर असल्याचे यातून दिसून येते. या सगळ्याचा अन्वयार्थ लेखकाने आपल्या चिंतनातून लावलेला आहे. गीतेमधील श्लोक आणि त्यांचा अर्थ स्पष्ट करताना आपल्याला जाणवणाऱ्या आकलनाच्या पातळीवरील अर्थ आपल्या विषयाशी कसा अनुरूप आहे याचे विवेचन थेट अनुभवाशी जोडलेले आहे. त्यामुळे गीता ही केवळ उपदेश नाही, वेदाचे सार नाही, तर जीवनाचे लौकिक सार असलेली अनुभूती आहे. तिचे व्यापक विश्वरूप असलेली गाथा आहे. जन्ममृत्यूच्या पलीकडचे दर्शन घडवणारा प्रकाश आहे. लेखक त्या प्रकाशाच्या वाटेने विपश्यनेच्या दिशेला प्रवास करत आलेले आहेत.

विपश्यनासाधना हा दु:ख निवारण्याचा मार्ग आहे, जो सिद्धार्थ गौतम यांनी शोधून काढला. या ज्ञानमार्गामुळे ते स्वत: जीवनमुक्त झाले, बुद्ध झाले आणि अनेकांना ही साधना शिकवून जीवनमुक्त केले.

विपश्यना या शब्दाचा अर्थ विशेष रूपाने पाहणे. पश्यना म्हणजे पाहणे, आपल्याच मनचक्षूंनी आतल्या आत डोळे बंद करून आपल्याच मनाने आपल्या शरीरपिंडात पाहणे. मनाची एकाग्रता हा विपश्यनेचा पहिला भाग तर दुसरा भाग वैश्विक सत्यावर आधारित आहे. तिची व्याप्ती शील, समाधी व प्रज्ञा या प्रमुख पैलूंवर आधारित आहे. तिच्या साधनेने सर्व विकारांचा हळूहळू विलय होत दु:खमुक्त जीवन जगता येते.

विपश्यनेविषयी लेखकाने सविस्तर असे विवेचन या पुस्तकात दिलेले आहे. स्वानुभव या पाठीशी आहे. त्यामुळे आधी केले, अनुभव घेतला, मग इतरांना सांगितले असे हे लेखन आहे. आपल्याला जे अनुभवाला आले, त्याचा उपयोग आणि अनुभव इतरांना व्हावा, हा या लेखनाचा हेतू आहे. या विषयी असणारे प्रश्न आणि शंका यांचेही त्यांनी निराकरण केलेले आहे. भगवान बुद्धांची शिकवण थोडक्यात विचार केलेली आहे आणि मार्ग दाखवला आहे, 'गौतम बुद्धाने सांगितलेली ही साधना शिकून, सराव करून व भगवान श्रीकृष्णाने सांगितलेला उपदेश अमलात आणून हा भवसागर तरून जाणे सहज शक्य आहे.' या पुस्तकाला डॉ. रविन थत्ते यांची समर्पक अशी प्रस्तावना लाभलेली आहे. बुद्ध आणि ज्या रथावर श्रीकृष्ण सारथ्य करत आहे, तो अर्जुनासह असलेला रथ मुखपृष्ठावर योजून सुंदर व आशयघन मुखपृष्ठ सजवले आहे शिरीष घाटे यांनी.

**मूल्य २५० रुपये  सवलतीत १५० रुपये**

# ग्रंथपान

**थेंबांनी विणली नक्षी**
**मोहन काळे**



**प्रत्येकाच्या मनामनातला पाऊस!**

*''येतो म्हणताना आला पाऊस*
*सोबत घेऊन मातीचा वास*
*थेंब पडताच वाटे धरणीस होतो*
*जन्मल्याचा पुन्हा भास*
*बघ दाटून आले ढग आकाशाच्या वेशीपाशी*
*देतील ते हाक मातीला एका नव्या जन्मासाठी''*

'पाऊस' या एकाच विषयावर भरभरून लिहिले गेले आहे. हा ऋतूच असा आहे तो नेहमी ताजा असतो. त्याचे येणे हे एकट्या पावसाचे नसते, सृष्टीसुद्धा त्याच्यासोबत नव्याने जन्म घेत असते. प्रतिभावंतांच्या बहराला तर नवा साज चढतो. त्याचे स्वागत करायला अवघे विश्व हात जोडून उभे असते. त्याच्यासोबत असताना वयालाही विसर पडलेला असतो आणि त्याची विविध रूपे! सर्वच अवर्णनीय असते. उरतो तो सुंदर भास, असते ते सुंदर स्वप्न! असा हा सुंदर मनोहारी पावसाचा स्वर्गीय थाटाचा खजिना घेऊन आले आहेत. कवी मोहन काळे, 'थेंबांनी विणली नक्षी' या कवितासंग्रहाच्या रूपाने.

प्रत्येकाच्या ठायी गुण असतात. काही चांगले, काही वाईट. नावच ठेवायचे झाले तर अवगुणसुद्धा म्हटले जाते आणि गुणापेक्षा त्या उणिवेवर पहिले बोट ठेवले जाते किंवा त्याचीच चर्चा अधिक होते. पावसाकडे असा एक गुण आहे, वेळेवर आगमन करण्याबाबतची उदासीनता! तो ठरल्या दिवशी सात जूनला आला तर आनंद होतोच, पण त्याचे म्हणावे तसा कौतुक होताना दिसत नाही. परंतु त्याने हा मुहूर्त टाळला, की लगेच चर्चेला सुरुवात होते. लोकांना कौतुकापेक्षा अवगुणाचे वाभाडे काढायला आवडत असावे. कवी पावसाच्या या उदासीनपणाबद्दल, अनिश्चिततेबाबत, त्याच्या रुसव्याफुगव्याबाबत मात्र अशी कुठली तक्रार करत नाही तर त्यातल्या ज्या रिकाम्या जागा आहेत, त्यांची भावभावना, संवेदना, आर्तता, हुरहुर अशा मनाच्या अवस्थांनी भरपाई करत व्यक्त होत जातो. असे का होत असावे, या प्रश्नाच्या मुळाशी येतो. यात उत्तरांची लांबलचक यादी तयार होते. झाडांची कत्तल, त्यांच्या जागी नवीन झाडांची लागवड न करण्याची वृत्ती, पाणी अडवा, पाणी जिरवाबाबतची उदासनीता अशा रूक्ष वातावरणात कुठला पाहुणा मुक्कामाला येईल? मग त्याची वाट पाहणे वगैरे आले ते वेगळे. अशावेळी कवी थेट त्यालाच त्याच्या लेट येण्याविषयी प्रश्न विचारतो. ''का येतोस दिवसेंदिवस तू असा लेट?''

अवघे विश्व त्याच्या एका थेंबासाठी आसावलेले असते. त्याची आर्तता कवी मांडतो, 'किती पाहावी वाट त्याची। डोळ्यांत नाही उरले पाणी।। न येणाऱ्या पावसासाठी। उरली ओठांत उन्हाची गाणी।।

पावसाची अवकृपा झाली तर काय होते, याचे चित्र, त्याचे अल्पसे येतो याचे चित्र, त्याचे लवकर निघून जाण्यानंतरचे चित्र, अशा चित्रांना कवीने शब्दांतून रेखाटले आहे. ढग, आकाश, जमीन, नदी, नाले, गवत, झाडी या सगळ्यांना सजीव करणारे वेगवेगळे रंग कवीने भरलेले आहेत.

पावसासमोर प्रत्येक जण लहान मूल झालेला असतो. त्याच्या होड्या खेळण्याचे वेड कधीही न संपणारे असते. वाहत्या पाण्यात खेळत जाणारी होडी ही नुसती कागदाची होडी नसते, ती असते प्रत्येकाच्या मनात दाटलेली होडी, अपेक्षांची, आनंदाची, कधीही न थांबणारी. या होडीइतकेच प्रत्येकाचे मन हलकेफुलके झालेले असते. कवी याला अपवाद नाही. पावसाच्या सोबतचे खेळण्याचे, होडी सोडण्याचे सगळे क्षण जिवंत करताना कवी या पावसाकडे पाहतो ते अलवार, निरागस मनाने. एक लहान मूल सतत त्याच्या आत खेळत असते, त्याच्या नजरेतून तो पावसाला टिपत राहतो.

येताना तो आवाज करीत येतो
लहान मुलांसारखा नि दुडूदुडू धावतो
नव्याने पाय फुटल्यागत

पाऊस नदीच्या मार्गाने समुद्रात जातो म्हणून त्याचे अस्तित्व संपले, असे होत नाही. पावसाचे नाते जमिनीशी अधिक घट्ट होते. आभाळातील ध्रुवताऱ्यासारखे, असे कवी वर्णन करतो तेव्हा पाऊस आणि सृष्टी यांच्यातील तो दूत असल्याचा भास होतो.


पाऊस लहानपणी पाहिला, मोठेपणी पाहिला, त्याच्यामुळे होणारे बदल पाहिले. पाऊस गावी असताना पाहिला, शहरात पाहिला, शाळेत जाताना अनुभवला. शहरात कामावर जाता-येता अनुभवला. शेतात पाहिला, बंद दरवाजात राहून खिडकीतून पाहिला, हे सगळे वेगवेगळे टप्पे पावसाचे आहेत तसे अनुभवी मनाच्या अवस्थांचेही आहेत. प्रत्येक वेळी आलेले अनुभव वेगवेगळे असले तरी ते चिरंतन आहेत आणि ते पावसाच्या प्रत्येक ऋतूत ते सुस्नात होण्यासाठी पुन्हा पुन्हा अल्लडपणे पावसाकडे धाव घेतात. त्यांचा अनुभव घेताना मन ओथंबून येते. चिंब होतो. पावसाचा प्रत्येक जगलेला अनुभव आपण पुन्हा जगू लागतो. कवीने पावसाच्या थेंबांनी विणलेली ही नक्षी, कवीची राहत नाही, त्या नक्षीचे आपण थेंब होतो.

या संग्रहातील कविता नदीच्या प्रवाहासारखी प्रवाही आहे. ती कुठल्याही क्लिष्ट खडकाशी ठेचकाळत नाही. तिला स्वत:चा नाद आहे; ती मुक्त आहे पण मुक्तछंदापासून दूर आहे. एकाच विषयाशी ती बांधिलकी ठेवून आहे तशी पुनरुक्ती वा प्रतिमांच्या हव्यापासून दूर आहे. एक नितांत नितळ आणि प्रसन्न पावसाच्या थेंबासारखी आपली वाटावी अशी ही कविता आहे. सर्व प्रभावांपासून मुक्त आहे म्हणूनच ती मोहन काळेची कविता आहे.

प्रा. अशोक बागवे म्हणजे शब्दांच्या आणि वक्तृत्वाच्या पाण्याने चिंब करणारा दाट कृष्णमेघ! त्यांची अभ्यासपूर्ण ओथंबलेली प्रस्तावना या संग्रहाला लाभलेली आहे. ती पुन्हा पुन्हा वाचावी, इतकी आशयसंपन्न आहे.

पाऊस म्हटला की इंद्रधनुष्य, हिरवळ, त्यावर नाचणारे-फुलणारे फुलांचे रंगीबेरंगी ताटवे आणि त्यात दुडूदुडू धावणारे मूल... पाऊस आपल्यासमोर आला आणि त्याला चिंब... असे सुंदर मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी या समूहास दिले आहे.

**मूल्य १५० रुपये सवलतीत १०० रुपये**





## पाऊसपर्ण

### जितेंद्र कुवर

कवितासंग्रह

**मूल्य २५० रु.  सवलतीत १५० रु.**





## आयदान

### उर्मिला पवार

आत्मकथन

**मूल्य ३०० रु.  सवलतीत २०० रु.**





# गोष्टी गुजरातच्या

### प्रकाश पेठे

लेखकाने कच्छच्या धवल रणापासून डांगच्या जंगलापर्यंत गाडीने, मोटारीने, जीपने, बसने फिरले. पायपीट केली. विद्यार्थ्यांबरोबर शेकडो घरी जाऊन गावकऱ्यांची वास्तपुस्त केली. अगणित छायाचित्रं काढली. नोंदी केल्या. लेखकाच्या मते इंजिनीयर-आर्किटेक्ट लोकांच्या अभ्यासाला कधी वाचा फुटत नाही, म्हणून हा खटाटोप. मुख्य म्हणजे लेखकाने स्वतः पाहिल्या-अनुभवल्याखेरीज एकही ओळ पुस्तकात लिहिलेली नाही.

**मूल्य ४०० रु.  सवलतीत २५० रु.**




# बखर घारापुरीची

### रवींद्र लाड

श्री. लाड यांनी, घारापुरीतील त्रिमूर्ती- महेशासह सर्व शिवप्रतिमा- शिल्पांची माहिती या पुस्तकात अत्यंत उत्कृष्टपणे करून दिली आहे. महाराष्ट्रातील अन्य महत्त्वाच्या लेणी-शिल्पांशी असलेले त्यांचे साम्य-भेद यांचा अभ्यासपूर्ण परामर्श त्यांनी घेतला आहे.


**– सेतुमाधवराव पगडी**

**मूल्य ३०० रु.  सवलतीत २०० रु.**

# ग्रंथाली क्षणचित्रे

विरारच्या विवा महाविद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पद्मश्री डॉ. शरद काळे यांच्या 'विज्ञानांजली' आणि 'प्रेरणा' या कवितासंग्रहांचे प्रकाशन झाले. त्यावेळी विद्यार्थ्यांसह डॉ. शोभा पाटकर, शरद काळे, उजवीकडून तिसऱ्या निशिगंधा काळे, सुदेश हिंगलासपूरकर आणि आमदार हितेंद्र ठाकूर





'रोजी–रोटी'चे प्रकाशन – धनश्री धारप, अस्मिता पांडे, सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. भालचंद्र मुणगेकर, लेखक विजय कसबे, अरुण जोशी, रुपाली कसबे आणि दीपा देशमुख




'तेजोमयी' प्रकाशनसमयी मृणाल कुलकर्णी, आनंद नाडकर्णी, सुधीर व चारूशीला निरगुडकर, सुबोध भावे, भरत दाभोळकर, ॲड. उज्ज्वल निकम, भूषण गगराणी, सुदेश हिंगलासपूरकर आणि आशुतोष डुंबरे



RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/ 2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.




मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.